दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–८० रविवार दि.३० जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

मधाचे बोट दाखवीले पण तरतुदीचे काय?

अजित पवार यांनी शुक्रवारी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात सरकारने मतांच्या बेगमीसाठी 'होऊ दे खर्च'चा संकल्पही सोडल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे राज्यावर वाढत चाललेला कर्जाचा बोजा, राज्याची वाढत चाललेली महसुली तूट, विविध क्षेत्रांच्या विकासाचा वा वाढीचा मंदावत असलेला विकासदर, राज्याची आर्थिक व औद्योगिक प्रगतीतच नव्हे तर कृषी उत्पादनातही होत असलेली घसरण, दरडोई उत्पन्नात झालेली घसरण, वीजनिर्मिती व वापरात झालेली घट आदी सर्व बाबींकडे या 'मत' संकल्पाने साफ दुर्लक्ष करून केवळ 'मत' संकल्पाचाच निर्धार केल्याचे स्पष्ट झाले आहे.

केजरीवालांना दिलासा नाहीच, कोठडीत १२ जुलैपर्यंत वाढ

नवी दिल्ली: दिल्ली मद्य धोरण प्रकरणी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कोठडीत वाढ करण्याची मागणी शनिवारी (दि.२९) सीबीआयने राऊस अव्हेन्यू न्यायालयाकडे केली. न्यायालयाने केजरीवाल यांना अबकारी धोरण प्रकरणाशी संबंधित सीबीआय प्रकरणात १२ जुलैपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दिल्ली मद्य धोरण प्रकरणी सीबीआयने बुधवार, २६ जून रोजी केजरीवाल यांना अटक केली होती. राऊस अव्हेन्यू न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली होती. त्यांच्या कोठडीत वाढ करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका सीबीआयने दाखल केली होती यावेळी केजरीवालांचे वकील विक्रम चौधरी यांनी सीबीआयच्या याचिकेला विरोध केला.

दूध उत्पादक कृती समिती अन्नत्याग करणार, सरकारला घाम फुटेना!

प्रतिलिटर ४० रूपयांचा भाव द्या, आठ दिवसाचा दिला अल्टिमेटम

पुणे । प्रतिनिधी

दुधाला ४० रुपये प्रतिलिटरचा दर मिळावा यासह विविध मागण्यांसाठी दूध उत्पादक कृती समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्याचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे यांनी आठ दिवसात मागण्या मान्य केल्या नाही तर शिखर शिंगणापूर ते पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या समाधी स्थळावर अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा समितीने दिला आहे. कृती समितीने आक्रमक भुमिका घेतली असली तर सरकारला मात्र शेतकऱ्यांप्रती घाम फूटत नसल्याचे दिसत आहे.

एकीकडे खासगी दूध संघाने दूध खरेदी दर कमी केले आहे तर दुसरीकडे केंद्र सरकारने दूध पावडर आयातीसाठी परवानगी दिली आहे. त्यामुळे दूध उत्पादक संताप व्यक्त करत आहेत. अन्नत्याग आंदोलनाच्या इशाऱ्याचे निवेदन समितीने मुख्यमंत्री, दोनही उपमुख्यमंत्री यांनी दिले आहे. मागील वर्षभरात दूध खरेदी दर ४० वरून २६ रुपये प्रतिलिटरवर आले आहेत. त्यामुळं दूध उत्पादकांना मोठा फटका बसला आहे. कारण पशूखाद्याचे दर वाढले आहेत. उत्पादन खर्चही वसूल होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड नुकसान सहन करावे लागत आहे. नागपूर अधिवेशनात मंत्री विखे यांनी ३५ रुपये दर देण्याचे आश्वासन दिले होते.

◀◀ पान २ वर

दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

दुधाला प्रतिलिटर ४० रुपये दर मिळावा. पशूखाद्याच्या गुणवत्तेवर सरकारने नियंत्रण ठेवावे. भेसळयुक्त दुधाचा महापुर रोखावा अन्यथा एफडीआय खाते बंद करावे. ११/०३/२०२४ ते ३०/०६/२०२४ पर्यंतचे अनुदान किचकट अटी नियम न घालता सरकारने सरसकट दूध उत्पादक शेतकऱ्यांना द्यावे. उत्तर प्रदेश राज्याच्या धरतीवर भाकड जनावरांना प्रति महिना दीड हजार रुपये अनुदान द्यावे. वजन मापे गुण नियंत्रक विभागाने प्रत्येक डेअरीवर दरमहा तपासणी पथके निर्माण करावी.

मुख्यमंत्र्यांनी घेतले ज्ञानोबा माऊलींच्या पादुकांचे दर्शन

आळंदी । प्रतिनिधी

ज्ञानोबा माऊलीच्या जयघोषात श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे शनिवारी आळंदी येथून प्रस्थान झाले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्ञानोबा माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. टाळ–मृदुंगाच्या तालावर भक्तिरसात चिंब झालेले वारकरी, ज्ञानोबा माऊली, माऊली, माऊली चा गजर, डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या–पताका घेतलेले वारकरी, असे भक्तिमय वातावरण आळंदीत पाहायला मिळाले.

आळंदी येथून आषाढी वारीसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे प्रस्थान केले. आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माऊलींच्या पादुकांचे दर्शन घेतले. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार श्रीरंग बारणे, प्रधान सचिव प्रवीण

◀◀ पान २ वर

कथित ऑडिओ प्रकरणी कुंडलिक खांडेंची पक्षातून हकालपट्टी

दुसऱ्या प्रकरणात अटकेनंतर कोर्टाकडून तीन दिवसाची पोलीस कोठडी

बीड । प्रतिनिधी

शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांची कथित ऑडिओ क्लिप गेल्या काही दिवसांपासून व्हायरल होत होती. या व्हायरल ऑडिओ क्लिप प्रकरणात त्यांचावर पक्षाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत कुंडलिक खांडे यांची हकालपट्टी करत असल्याची घोषणा शिवसेनेकडून करण्यात आली आहे. तर दुसऱ्या एका प्रकरणात त्यांना जामखेडवरुन

◀◀ पान २ वर

एका क्लिपमुळे पदही गेले अन् जेलवारी मिळाली

शिंदे शिवसेना ही महायुतीमधील घटकपक्ष आहे. त्यामुळे बीड लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचे काम करणे अपेक्षित असताना त्यांनी अंधारातून बजरंग सोनवणे यांना मदत केली. हे सर्व एका क्लिपमुळे उघड झाल्यानंतर कुंडलिक खांडे यांच्यामागे शुक्लकाष्ट सुरु झाले आहे. दोन महिन्यापुर्वी दाखल झालेल्या ३०७ गुन्ह्यात अटक झाली. त्यानंतर शनिवारीच त्यांच्यावर पक्षाने शिस्तभंगाची कारवाई करीत पक्षातून हकालपट्टी केली. एका क्लिपने पदही गेले अन् जेलवारीही खांडेंच्या नशीबी आली.

केंद्रीय सशस्त्र पोलिस दलासाठी ४ ऑगस्टला परीक्षा

नवी दिल्ली: केंद्रीय सशस्त्र पोलिस दल भरतीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग अर्थात यूपीएससीने या भरतीसाठी परीक्षेची तारीख जाहीर केली आहे. यूपीएससीकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार ४ ऑगस्ट रोजी परीक्षा घेण्यात येणार आहे.

परीक्षेच्या वेळापत्रकाची माहिती यूपीएससीच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. असिस्टंट कमांडंट परीक्षा ४ ऑगस्ट २०२४ रोजी देशभरातील नियुक्त परीक्षा केंद्रांवर दोन

◀◀ पान २ वर

माजी आ.भीमराव धोंडे यांना ब्लॅकमेल करणाऱ्या दोघांना अटक

एक कोटीच्या खंडणीची मागणी; अश्लील व्हिडिओ क्लिप व्हायरल करण्याची दिली होती धमकी

अहमदनगर । प्रतिनिधी

अश्लील व्हिडिओ क्लिप व्हायरल करण्याची धमकी देऊन माजी आमदार भीमराव धोंडे यांना ब्लॅकमेल करून एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत दोन महिलांसह एका स्थानिक वृत्तवाहिनीच्या पत्रकाराने खंडणी मागितल्याबाबत अहमदनगरच्या कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याने अहमदनगरमध्ये एकच खळबळ उडाली आहे. यातील एका पत्रकारासह महिलेला अटक करण्यात आली असून एक महिला फरारी आहे.

माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये नमूद केले आहे की, तुमची अश्लील व्हिडिओ क्लिप आमच्याकडे आहे. ती सोशल मिडियावर व्हायरल करायची नसेल, तर आम्हाला एक कोटी २५ हजार रुपये द्यावे लागतील, अशी खंडणीची मागणी करत दोन महिलांसह एका युट्युब पोर्टल चालवणारा तथाकथित पत्रकार ब्लॅकमेल करत होते. पैसे दिले नाही

◀◀ पान २ वर

सरकारच्या अनागोंदीमुळे ४५ लाख विद्यार्थी गणवेशाविना

विरोधी पक्षनेते दानवे यांचा सरकारवर आरोप

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शाळेत गणवेश देण्याच्या प्रथा परंपरेला सरकारच्या अनागोंदी व गैरकारभारामुळे छेद गेला असल्याचा आरोप विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. शाळा सुरू होऊन १५ दिवस उलटले तरी सरकारच्या एक राज्य एक गणवेश या धोरणामुळे ४५ लाख विद्यार्थी गणवेशाविना वंचित राहिले असल्याकडे दानवे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. जिल्हा परिषदेच्या शाळेत सर्वसामान्य दिन दुबळे विद्यार्थी शिक्षण घेत असतात. गोरगरीब विद्यार्थ्यांना दोन गणवेश मिळणं हा मोठा आधार असतो. मात्र सरकारच्या धरसोडी धोरणाचा फटका या विद्यार्थ्यांना बसल्याचा आरोप दानवे यांनी केला.

आधी विद्यार्थ्यांना बचत गटाच्या माध्यमातून कपडे देऊन गणवेश शिवून दिले जायचे. मात्र आता बचतगटाला काम देण्याच्या नावाखाली एकाच कंत्राटदाराला कपडे खरेदीचे कंत्राट देण्यात

◀◀ पान २ वर

श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील सुरू असलेल्या विकास कामांची धनंजय मुंडेंकडून पाहणी

पूर्वेकडील प्रवेशद्वार, पायऱ्या यांसह प्रदक्षिणा मार्गाचे काम गतीने सुरू

परळी वै.। प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी येथील श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी राज्य शासनाकडून २८६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून या माध्यमातून सध्या सुरू असलेल्या विविध विकास कामांची आज मंत्री धनंजय मुंडे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

मंदिराच्या पूर्वेस असलेल्या मुख्य प्रवेशद्वार, स्वागत कमान, मेघडंबरी, तसेच मंदिराकडे जाणाऱ्या चिरेबंदी दगडातील पायऱ्यांचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या कामांची पाहणी करून धनंजय मुंडे यांनी अधिकारी व कंत्राटदार यांना योग्य त्या सूचना दिल्या. चिरेबंदी दगड बसवताना ते एका रेषेत असावेत तसेच खालीवर होऊ नये त्यावर खड्डे पडणार नाही यासाठी योग्य दगडाची निवड करून त्यांचे रचना उत्तमरीत्या करावी अशाही सूचना यावेळी त्यांनी दिल्या. प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या भोवती मेरू पर्वताकडून जाणाऱ्या मंदिर प्रदक्षिणा मार्गाचे रुंदीकरण पूर्ण झाले असून त्यावर आता नाली व काँक्रीट

◀◀ पान २ वर

परळीत गोळीबार, सरपंच ठार अन्य दोघे जखमी

बीड । पतिनिधी

शहरातील संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गोळीबार झाल्याची घटना घडली असून यातील मयत हे मरळवाडी येथील सरपंच बापू आंधळे हे असल्याचे समजते तर या घटनेमध्ये अन्य दोघेजण जखमी झाले असून ही घटना शनिवार रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. त्यामुळे परळी शहरात दहशतीचे वातावरण आहे.

नुकत्याच लोकसभा निवडणुका पार पडले आहेत. त्यानंतर बरेच दिवस तणावाचे वातावरण होते. सोशल मीडियावर चुकीच्या पोस्ट टाकल्याने गुन्हे दाखल झाले, हाणामाऱ्या झाल्या. परळी शहर हे नेहमीच संवेदनशील असल्याने अनेक घटना होत असतात. शनिवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारात संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये बँक कॉलनीत गोळीबार झाला असून यामध्ये सरपंच बापूराव आंधळे हे जागिच ठार झाले असून नंदागौळ येथील ग्यानबा गिते यांच्या सह दोघे जखमी झाले आहेत. गोळीबार नेमका कशामुळे झाला हे मात्र अद्याप समजू शकले नाही. तसेच गोळीबार करणारा कोण आहे हेही समजू शकले नाही. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ०.५० क्विंटल			
	२,३४१	२,३४१	२,३४१
ज्वारी/हायब्रिड : ४.०० क्विंटल			
	२,१५०	२,४४१	२,३२२
मूग : १.०० क्विंटल			
	७,२७६	७,५०१	७,३८८
तूर : ४.५० क्विंटल			
	११,४४०	११,४४०	११,४४०
उडीद : ९.५० क्विंटल			
	२,३३२	२,६००	२,४४४
बाजरी: ७.०० क्विंटल			
	२,३७२	२,७००	२,५७१
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल			
	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन: ८.५० क्विंटल			
	४,४६०	४,४६०	४,४६०
हरभरा: १.५० क्विंटल			
	४,७००	६,३००	५,५००

राज्यातील ज्येष्ठांना घडणार तीर्थदर्शन

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेची शिंदे यांची घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन घडविण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी विधानसभेत केली. या योजनेसाठी धोरण आणि नियमावली तयार करून ज्येष्ठांना शासनाच्या माध्यमातून तीर्थस्थळांच्या दर्शनासाठी नेण्यात येईल, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. या संदर्भात विधानसभा सदस्य प्रताप सरनाईक यांनी लक्षवेधी

◀◀ पान २ वर

मराठा आरक्षणाबाबत १० दिवसांत निर्णय

राज्य सरकार गांभीर्याने विचार करीत असल्याची अब्दुल सत्तार यांची माहिती

छ. संभाजीनगर। प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे यांच्या मागणीबाबत राज्य सरकार गांभीर्याने विचार करत आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडून एकत्रितपणे पुढील १० दिवसांमध्ये निर्णय घेतला जाईल, अशी माहिती राज्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांनी शनिवारी (दि.२९) छत्रपती संभाजीनगरमधील पत्रकार परिषदेमध्ये दिली. कायद्याच्या चौकटीमध्ये बसवून मराठा बांधवांना न्याय देता येईल, असेही त्यांनी नमूद केले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक येथे मंत्री सत्तार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले की, मनोज जरांगे हे राजकारणात नसले तरी आयकॉन आहेत. त्यांच्या मागे मराठा समाजाचा मोठा जनसमुदाय उभा आहे. सर्वजण त्यांना आपला आदर्श मानतात. मराठा आरक्षणासाठी त्यांचा प्रदीर्घ लढा सुरू आहे. त्यांच्या

◀◀ पान २ वर

सहमतीचे संबंध बलात्कार ठरत नाहीत–मुंबई उच्च न्यायालय

मुंबई । प्रतिनिधी

दोन प्रौढ व्यक्तींमधील रिलेशनशिप हा जोडीदारावर लैंगिक अत्याचाराचे समर्थन ठरत नाही, असा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांनी हा निकाल दिला आहे.

न्यायमूर्तींनी म्हटले आहे की, ''याचिकाकर्त्या प्रियकराने या प्रकरणातील महिलेशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले, असा आरोप आहे. एका क्षणी तुमच्यातील संबंध हे सहमतीने असू शकतात, तर काही वेळा जोडीदाराची याला सहमती असणार नाही. जेव्हा जोडीदार लैंगिक संबंधासाठी इच्छुक नसतो, तेव्हा नातेसंबंधातील सहमती संपलेली असते. या प्रकरणातील एफआयआरमध्ये सहमतीतील सातत्य दिसत नाही.'' या प्रकरणातील प्रियकरावर कलम ३७६, कलम ३७६ (२), कलम ३७७, कलम ५०४ आणि कलम ५०६ नुसार सातारा

जिल्ह्यातील कराड येथे गुन्हा नोंद आहे. प्रियकराचे म्हणणे असे आहे की, या महिलेचा घटस्फोट झालेला आहे आणि ती तिच्या चार वर्षांच्या मुलासोबत त्याच्या शेजारी राहते. २००२ ला त्यांची ओळख झाली. सोशल मीडियावर सुरुवातीला त्यांची ओळख झाली. नंतर त्यांच्यात प्रेमसंबंध जुळल्याचे त्याने म्हटले आहे. तर लग्नाचे वचन देऊन प्रियकर सतत शरीरसंबंधासाठी दबाव टाकत होता, तिचा याला विरोध होता. जुलै २०२२ मध्ये बॉयफ्रेंडने शरीरसंबंध ठेवले नाही तर जीव देईन, अशी धमकी देत दोन वेळा बलात्कार केला. नोकरी लागताच लग्न करू, असे आश्वासन दिले होते. त्याने अनैसर्गिक संबंध ठेवले. मात्र त्यानंतर लग्नास नकार दिला, असे महिलेने तक्रारीत म्हटले आहे. हा गुन्हा नोंद झाल्यानंतर प्रियकराने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. दोघांतील संबंध सहमतीने होते. तसेच तक्रारदार महिला ही आधीच विवाहित

◀◀ पान २ वर

अग्रलेख

मधाचे बोट दाखवीले पण तरतुदीचे काय?

अजित पवार यांनी शुक्रवारी सादर केलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पात सरकारने मतांच्या बेगमीसाठी 'होऊ दे खर्च'चा संकल्पही सोडल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे राज्यावर वाढत चाललेला कर्जाचा बोजा, राज्याची वाढत चाललेली महसुली तूट, विविध क्षेत्रांच्या विकासाचा वा वाढीचा मंदावत असलेला विकासदर, राज्याची आर्थिक व औद्योगिक प्रगतीतच नव्हे तर कृषी उत्पादनातही होत असलेली घसरण, दरडोई उत्पन्नात झालेली घसरण, वीजनिर्मिती व वापरात झालेली घट आदी सर्व बाबींकडे या 'मत' संकल्पाने साफ दुर्लक्ष करून केवळ 'मत' संकल्पाचाच निर्धार केल्याचे स्पष्ट झाले आहे.

तसे अतिरिक्त अर्थसंकल्प सादर होण्याच्या पूर्वसंध्येला प्रथेप्रमाणे सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात राज्याच्या गंभीर बनत चाललेल्या अर्थस्थितीची जाणीव करून देण्यात आली होती. त्यामुळे 'राष्ट्र प्रथम' या भाजपच्या आवडत्या घोषवाक्याची जाणीव ठेवून महायुती सरकारच्या या अर्थसंकल्पात राज्याची आर्थिक पीछेहाट रोखण्यासाठी काही ठोस धोरणे आखली जातील अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात अतिरिक्त अर्थसंकल्पावर मतपेरणीचा 'निर्धार' भारी पडल्याचेच स्पष्ट होते. त्यामुळे भाजपच्या 'राष्ट्र प्रथम'कडे साफ दुर्लक्ष करून 'मत' संकल्पावरच पूर्ण भर देण्यात आला आहे. महिला मतदारांना खुश करण्यासाठी त्यांच्यावर घोषणांचा व योजनांचा पाऊस पाडण्यात आला आहे. त्यात मध्य प्रदेशात भाजपसाठी 'गेमचेंजर' ठरलेल्या 'लाडली बहना' योजनेची झेरॉक्स कॉपी असणारी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महायुती सरकारने आणली आहे. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेअंतर्गत राज्यातील पात्र महिला लाभार्थ्यांना वर्षाला तीन गॅस सिलिंडर मोफत देण्यात येणार आहेत. तर वार्षिक आठ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील मुलींना मोफत शिक्षण देण्याची घोषणा महायुती सरकारने केली आहे. यात वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या मुलींनाही शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्कात पूर्ण माफी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शुभमंगल सामूहिक नोंदणीकृत विवाह योजनेतील लाभार्थी मुलींना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये करण्यात आले आहे. राज्यातील सर्व आरोग्य उपकेंद्रांत स्तन व गर्भाशयमुखाच्या कर्करोग तपासणीसाठी उपकरणे व साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यासाठी या अर्थसंकल्पात ७८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एकंदर आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मतांची बेगमी करण्यासाठी समाजातील सर्वच घटकांना 'मधाचे बोट' लावण्याची कसरतच या अतिरिक्त अर्थसंकल्पात पदोपदी करण्यात आलेली आहे. मात्र, राज्याच्या अर्थअधोगतीवर मौनच बाळगण्यात आले आहे. त्यामुळे या लोकप्रिय घोषणांच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या तिजोरीत जो बक्कळ पैसा यावा लागतो तो कुठून येणार हा प्रश्न गुलदस्त्यातच आहे.

जगाला गंडविणाऱ्या 'क्रिप्टोक्वीन'च्या मागावर एफबीआय!

वॉशिंग्टन : वृत्तसंस्था

सध्या क्रिप्टोकरन्सीची सगळीकडे चर्चा आहे. वेगवेगळ्या देशांत या क्रिप्टोकरन्सीसाठी वेगवेगळे नियम आहेत. दरम्यान, याच क्रिप्टो जगतातील प्रसिद्ध अशा रुजा इग्नाटोव्हा या 'क्रिप्टोक्विन'वर अमेरिकेने ५० लाख डॉलर्स म्हणजेच साधारण ४२ कोटी रुपयांचे बक्षीस ठेवले आहे. कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा तिच्यावर आरोप आहे.

रुजा इग्नाटोव्हा या क्रिप्टोक्वीनने 'वनकॉईन' नावाने एक बनावट, खोटी क्रिप्टोकरन्सी चालू केली होती. या क्रिप्टोकरन्सीच्या मदतीने जगभरातील लोकांना तब्बल ४०० कोटी डॉलर्सचा चुना लावल्याचा आरोप आहे. तिच्याविरोधात अमेरिका आणि जर्मनी या दोन्ही देशांत गंभीर स्वरुपाचे आरोप आहेत. ऑक्टोबर २०१७ मध्ये तीने अमेरिकेतून पळ काढला. तेव्हापासून फरार आहेत. सध्या अमेरिकेच्या एफबीआयकडून शोध घेतला जात आहे. रुजा इग्नाटोव्हा ही बुल्गारिया येथील असून ती ४४ वर्षाची जर्मन नागरिक आहे. तीने सेबस्टियन कार्ल ग्रीनवूड या आपल्या सहका-यासोबत सुरुवातीला बिकॉईन नावाने एक फसवी क्रिप्टोकरन्सी लॉन्च केली होती. त्यानंतर त्यांनी २०१४ मध्ये सोफिया येथे वनकॉईन नावाने आणखी एक फसवी क्रिप्टोकरन्शी लॉन्च केली. या क्रिप्टोकरन्सीच्या नावाने रुजा इग्नाटोव्हा हिने लोकांकडून अब्जो डॉलर्स जमा केले. त्यानंतर लोकांच्या लक्षात आले की 'वनकॉईन' नावाची क्रिप्टोकरन्सी ही बनावट आहे. या क्रिप्टोकरन्सीच्या सुरक्षेसाठी ब्लॉकचेन नाही, हे तथ्य समोर आले होते. वनकॉईन या फसव्या क्रिप्टोकरन्सीची किंमत नेहमीच चुकीच्या पद्धतीने फसवणूक करून ठरवली जायची. एकीकडे बिटकॉईनच्या किमतीत चढ-उतार दिसायचे. पण वनकॉईनची किंमत सतत वाढलेली दिसायची. 'वनकॉईन' या क्रिप्टोकरन्सीसाठी 'एक्सकॉइनएक्स' नावाचे खासगी एक्सचेंज तयार करण्यात आले होते. लोकांना सहज पद्धतीने पैसे काढता येऊ नयेत, अशी त्याची रचना करण्यात आली होती. समजा तुमच्याकडे १,००० 'वनकॉईन' असतील तर एका दिवसात फक्त १५ वनकॉईनच विकता येत होते. जानेवारी २०१७ मध्ये मेन्टेनन्सच्या नावाखाली ते अचानक बंद करण्यात आले. त्यानंतर हे प्रकरण पोलिसांपर्यंत गेले. इग्नाटोव्हा यांच्याविरोधात आरोपपत्र निश्चित झाल्यानंतर त्या २०१७ मध्ये फरार झाल्या. इग्नोटोव्हा यांचे साथीदार ग्रीनवूड यांना २०१८ साली थायलँडमध्ये अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांचे अमेरिकेत प्रत्यार्पण करण्यात आले. ग्रीनवूड यांना २० वर्षांचा तुरुंगवास ठोठावण्यात आला तसेच गुंतवणूकदारांना त्यांनी ३० कोटी डॉलर परत करावेत, असा आदेशही न्यायालयाने दिला.

बीडः बायपास येथील कृष्णा मंगल कार्यालय येथे कोल्हारवाडीचे सरपंच रमेशजी भोसले यांच्या बंधूच्या विवाह सोहळ्यास शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहुन नववधूवरास पुढील वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शिवसेनेचे बीड तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, अजय गायकवाड, दिपक घोडके सह सर्व मान्यवर उपस्थित होते.

ब्र.गोविंद पंत ज्ञानेश्वर महाराजांचे आजोबा यांच्या पालखी सोहळ्याचे ६ जुलै शनिवारी बीड येथून प्रस्थान होणार

बीड । प्रतिनिधी

ज्ञानेश्वर माऊली आळंदी देवाची यांचे आजोबा ब्र गोविंद पंत जी यांचा भव्य दिव्यरथ पालखी सोहळा यावर्षी दिनांक ६ जुलै शनिवार २०२४ रोजी बीड येथून प्रस्थान करणार आहे.

आषाढी वारी निमित्त दरवर्षी या पायी वारी सोहळ्याचे आयोजन केले जाते. यावर्षी हा पालखी सोहळा मोठ्या थाटामध्ये मार्गस्थ होणार आहे .या पालखी सोहळ्या चा प्रवास तब्बल बारा दिवसाचा आहे .पालखी मार्ग पाली, रवळस गाव ,चौसाळा ,पारगाव, कुंतलगिरी फाटा वडाचीवाडी ,वाकडी , वडसीगी, बाबळगाव व श्रीक्षेत्र पंढरपूर असा आहे . श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पालखी सोहळा मुक्कामाचे ठिकाण दिनकर चव्हाण यांचा मळा श्री गणेश हॉटेल च्या बाजूला

आषाढी वारी दिव्यरथ पालखी सोहळा

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे राहील वारीमध्ये मुक्कामी ठिकाणी रात्री नामवंत महाराज मंडळींची हरिकीर्तन सेवा होणार आहे. तसेच हरिजागर होणार आहे. यामध्ये भारुड ,गवळणी, अभंग इत्यादीचा भाविक भक्तांना व दिंडीतील वारकऱ्यांना आनंद घेता येणार आहे . या भव्य दिव्य पालखी सोहळ्यामध्ये भाविक भक्तांनी आपली नोंदणी करून आपल्या पालखी सोहळ्यातील स्थान निश्चित करावे असे आवाहन या पालखी सोहळ्याची नेतृत्व करणारे पालखी प्रमुख ह भ प संगीत विशारद सुग्रीव महाराज डाके यांनी केले आहे .या भव्य पालखी सोहळ्यामध्ये ज्या भाविक भक्तांना सहभागी व्हावयाचे आहे त्यांनी खालील मोबाईल नंबर ९८३४२३९८३५ या वर संपर्क करावा या पायी दिंडी सोहळ्यासाठी विशेष मार्गदर्शन राधाकृष्ण महाराज वाव्हाळ व ह भ प श्रीमंत अण्णा वाघमारे यांचे आहे आहे.

पिकविमा काढतांना शेतकऱ्यांची फसवणुक केल्यावर गय नाही-धनंजय मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगामासाठी एक रुपयात पिक विमा भरणे चालू आहे, मात्र राज्यात काही ठिकाणी सीएससी केंद्र चालक हे शेतकऱ्यांकडून एक रुपयाच्या वर अवैधरित्या काही आगाऊ रक्कमा वसूल करत असल्याचा तक्रारी प्राप्त झाल्या असून, आगाऊ पैसे वसूल करणाऱ्या केंद्र चालकांची पुराव्या सह तक्रार आल्यास आपण त्यांच्यावर कारवाई करणार असून अशा लोकांची अजिबात गय केली जाणार नाही, असा इशारा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला आहे.

याबाबत धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांना आगाऊ पैसे मागणाऱ्या सीएससी केंद्र चालकांची शक्य असेल त्या पुराव्यासह राज्य शासनाचा कृषी हेल्पलाइन व्हाट्सअप क्रमांक ९८२२४४६६५५ या क्रमांकावर व्हाट्सअप द्वारे थेट तक्रार करावी किंवा स्थानिक तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे याबाबत तक्रार द्यावी असे आवाहन केले आहे. सदर केंद्र चालकांवर ग्रामविकास विभागाच्या मदतीने कडक कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा मुंडे यांनी दिला आहे. शेतकऱ्यांना पिक विम्याचा एक अर्ज भरण्यासाठी एक रुपया इतकीच रक्कम पोर्टलवर भरणे अपेक्षित आहे तर यासाठी संबंधित केंद्र चालकाला शासनाकडून प्रति विमा अर्ज ४० रुपये मानधन दिले जाते. मात्र काही केंद्र चालक सात-बारा ऑनलाइन काढणे, पेरणी प्रमाणपत्र यासारख्या बाबींच्या नावाने शेतकऱ्यांना आगाऊ पैसे मागत असल्याच्या तक्रारी येत आहेत, या विरोधात आता धनंजय मुंडे यांनी अधिक कडक भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.

लाडक्या लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी जनसागर उसळनार

बीड । प्रतिनिधी

लोकनेते विनायकराव मेटे यांचा दोन वर्षा पूर्वी मराठा आरक्षणाच्या बैठकीला जात असताना अपघाती निधन झाले त्यांच्या मृत्यूनंतर ही दुसरी जयंती आज दि. ३० जून रविवार रोजी सकाळी ११:०० वाजता साजरी करण्यात येणार आहे. स्व. विनायकराव मेटे यांनी आपल्या हयातीमध्ये सर्वसामान्यशी जोडलेली नाळ एकदम घट्ट होती .त्यामुळे आज त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठीजनसागर उसळनार आहे. त्याचबरोबर प्रमुख उपस्थिती मनोज जरांगे पाटील, यांच्यासह मराठवाडा गौरव पुरस्कार प्राप्त अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर यांची राहणार आहे. त्याचबरोबर राज्यातील विविध भागातून त्यांच्या चाहते आणि मान्यवर स्मृती स्थळाचे दर्शन घेण्यासाठी येणार आहेत. लोकनेते विनायकराव मेटे यांची आज जयंती बीड येथील कॅनॉल रोड येथील स्मृती स्थळी साजरी होणार आहे. याकरिता याठिकाणी मोठी तयारी करण्यात आली आहे.अगील वर्षी देखील आपल्या लाडक्या नेत्याला आदरांजली अर्पण करण्यासाठी चहात्यांनी मोठी गर्दी केली होती. यावर्षी देखील त्याच उत्साहात आदरांजली अर्पण करण्यासाठी राज्यासह बीड जिल्हा, बीड शहर आणि गावा गावातील स्व. मेटे यांच्यावर प्रेम करणारे चाहते त्यांच्या स्मृतीस्थळी दाखल होणार आहेत.

'नीट' : तपासाचा फोकस आता लातूर ऐवजी बीडवर केंद्रित

बीड : प्रतिनिधी

नीट पेपरफुटीप्रकरणाचे धागेदोरे लातूरपर्यंत असल्याचे म्हटले जात होते. पण पोलिसांच्या तपासाचे केंद्र आता लातूर ऐवजी बीडमध्ये स्थिरावले आहे. आरोपींकडे सापडलेल्या १४ प्रवेशपत्रांपैकी ८ प्रवेशपत्र बिहारमधील आहेत. त्यात १ लातूरचा तर ७ बीडचे विद्यार्थी आहेत. सापडलेल्या प्रवेशपत्रांपैकी सर्वाधिक संख्या ही बीडच्या विद्यार्थ्यांची असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे पोलिसांचे लक्ष आता बीडकडे वळाले आहे.

नीट पेपरफुटीचा तपास आता सीबीआयकडे वर्ग झालेला आहे. सीबीआयची टीम लातूरमध्ये दाखल होण्याची दाट शक्यता आहे. हे प्रकरण उघड झाल्यानंतर लातूर पोलिसांनी चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला होता. संजय जाधव आणि जलीलखाँ पठाण यांना पोलिसांनी अटक केली. इतर दोन आरोपी फरार आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. आरोपींच्या चौकशीतून पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे एकूण १४ पैकी ८ प्रवेशपत्र हे परराज्यातील आहेत. त्यापैकी ७ प्रवेशपत्र हे बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे आहेत, तर १ प्रवेशपत्र हे लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्याचे आहेत. याच कारणामुळे लातूर पोलिसांच्या तपासाचा फोकस आता बीड जिल्ह्याकडे वळला आहे. पोलिसांनी तेथील पालकांची चौकशी केली आहे.

पान १वरून...

दूध उत्पादक कृती समिती

पण प्रत्यक्षात मात्र दूध संघांकडून २५ रुपये दराने दूध खरेदी करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना धुमसत आहे. आठ दिवसात मागण्या मान्य केल्या नाही तर अन्न त्याग करणार असल्याची भूमिका समितीने घेतली आहे. तसेच मागण्या मान्य झाल्याशिवाय कुठल्याही परिस्थितीमध्ये माघार घेणार नाही, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

माजी आ.भीमराव धोंडे यांना यांना

तर तुमचे राजकीय कारकीर्द उद्ध्वस्त करू, अशी धमकी देत होते. संबंधित महिलांशी तडजोड करून देण्याची ऑफर देत धोंडे यांना खंडणी मागिल्याने एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अहमदनगर येथील कोलवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन एका पत्रकारासह दोन महिलांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. यातील एका युट्युब चॅनेलचा पत्रकार इस्माईल दर्यानी उर्फ भैय्या बॉक्सर याच्यासह एका महिलेला अटक केली असून त्यांना न्यायालयासमोर हजर केले. न्यायालयाने या दोघांना दोन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली असून यातील एक महिला अद्याप फरारी आहे.

केंद्रीय सशस्त्र पोलिस

सत्रांमध्ये घेतली जाईल. पेपर-१ सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत घेण्यात येईल. ज्यामध्ये सामान्य क्षमता आणि बुद्धिमत्ता विषयांचे प्रश्न विचारले जातील. याशिवाय पेपर-२ दुपारी २ ते ४ या वेळेत घेण्यात येईल. पेपर- २ मध्ये सामान्य अध्ययन, निबंध आणि आकलन या विषयांचे प्रश्न येतील. या भरतीसाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना परीक्षेच्या तारखेच्या काही दिवस आधी परीक्षेला बसण्यासाठी प्रवेशपत्र उपलब्ध करून दिले जाईल. प्रवेशपत्र उपलब्ध होताच उमेदवार यूपीएससीच्या अधिकृत वेबसाइटवर लॉगिन तपशील भरून ते ऑनलाइन मोडद्वारे डाऊनलोड करू शकतील. या भरतीद्वारे एकूण ५०६ रिक्त पदांची नियुक्ती केली जाईल. यामध्ये बीएसएफमध्ये १८६, सीआरपीएफमध्ये १२०, सीआयएसएफमध्ये १००, आयटीबीपीमध्ये ५८ आणि एसएसबीमध्ये ४२ पदांची भरती केली जाणार आहे. भरतीशी संबंधित तपशीलवार तपशील मिळविण्यासाठी उमेदवार अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकतात.

कथित ऑडिओ प्रकरणी

अटक झाल्यावर न्यायालयासमोर हजर केले असता तीन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. कुंडलिक खांडे यांची कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर त्याचे पडसाद संपूर्ण बीड जिल्ह्यात उमटल्याचे पाहायला मिळाले. शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांना पोलिसांनी अटक केल्यानंतर पक्षाकडून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पक्षातून त्यांची हकालपट्टी करण्यात आली असून दुसऱ्या एका प्रकरणात खांडे यांना बीड एलसीबीने जामखेडमधून अटक केली असून न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना तीन दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.

श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील सुरू

रस्त्याचे काम वेगाने सुरू आहे. या कामाच्या ठिकाणी देखील धनंजय मुंडे यांनी पाहणी करत रस्त्याचा चढ - उतार यासह सावलीची व्यवस्था, पोलीस ठाण्याकडे जाणारा रस्ता, तिथे असणारी उंची, यामध्ये करावयाचे बदल याबाबत संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यावेळी ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड, नगरसेवक राजेंद्र सोनी, प्रताप धर्माधिकारी, नगर अभियंता श्री बेंडले त्याचबरोबर पदाधिकारी तसेच संबंधित कंत्राटदार आदी उपस्थित होते.

सरकारच्या अनागोंदीमुळे ४५

आले आहे. सदर कंत्राटदार कपडा कट करून राज्यातील शाळेला पाठवत आहे. शाळा नंतर महिला विकास आर्थिक महामंडळच्या माध्यमातून कपडे शिवून देते अशी व्यवस्था आहे. त्यासाठी स्थानिक टेलर नेमले असताना कपडा का दिला जात नाही, असा सवाल दानवे यांनी उपस्थित केला. सरकारच्या एक राज्य एक गणवेश धोरणामुळे बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली असून हे काम खासगी कंत्राटदाराच्या घशात घातल्याचा आरोप दानवे यांनी केला. सरकारकडून १५ ऑगस्टपर्यंत गणवेश मिळतील, असे सांगण्यात आले होते, मात्र त्या कालावधीत गणवेश मिळतील की नाही यात शंकाच आहे. यावर चर्चा होणे आवश्यक होती, मात्र ती झाली नसल्याबाबत दानवे यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यातील गोरगरीब ४५ लाख विद्यार्थ्यांना न्याय मिळायला हवा, अशी भूमिका विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सभागृहात मांडली.

मराठा आरक्षणाबाबत १०

मागणीबाबत राज्य सरकार गंभीर असून, हा विषय आता कारणी लावयाचा आहे. आरक्षणाबाबत कोणी राजकारण करत असेल त्याच्याशी मला काही घेणे देणे नाही. एकच बोलायचे आहे की, ओबीसी समाजावर अन्याय न होता मराठा बांधवांना कायद्याच्या चौकटीमध्ये बसवून न्याय देता येईल. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचे सतत प्रयत्न सुरु आहेत. ते अधिकाऱ्यांच्या तासनतास बैठका घेत आहेत. तसेच विधी तज्ञांसोबत सातत्याने चर्चा करत आहेत. मराठा बांधवांना ते न्याय देतील असा आम्हाला शंभर टक्के विश्वास आहे., असे सत्तार म्हणाले.

राज्यातील ज्येष्ठांना घडणार

सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आमचे सरकार सर्वसामान्यांचे असून शुक्रवारी मांडण्यात आलेल्या अतिरिक्त अर्थसंकल्पामध्ये शेतकरी, कष्टकरी, वारकरी, कामगार, महिला, युवा यांच्यासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आपला महाराष्ट्र संतांची भूमी असून दरवर्षी अनेक जण तीर्थस्थळांना भेटी देतात. ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन सुलभपणे होण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वंकष धोरण तयार करून त्याची नियमावली केली जाईल. त्याअंतर्गत आवर्तन पद्धतीने, ऑनलाईन अर्ज मागवून ही योजना राबविण्यात येईल, असेही यावेळी सांगितले. यावेळी झालेल्या चर्चेत सर्दस्य सर्वश्री राम कदम, प्रकाश सुर्वे, देवयानी फरांदे, मनीषा चौधरी आदी सदस्यांनी भाग घेतला.

आता सरकारलाच तीर्थक्षेत्रावर जाण्याची वेळ - नाना पटोले

नाना पटोले म्हणाले की, आता या सरकारलाच तीर्थक्षेत्रावर जाण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राच्या जनतेने या सरकारला आपली जागा दाखवली आहे. बजेट सादर केले, घोषणा केल्या पण पैसे कुठून आणणार? याचे उत्तर सरकारकडे नाही. घोषणांचे पालन पूर्णपणे शून्य आहे. सरकार आता खोटे बोलून नॅरेटिव्ह सेट करत आहे. वारकरी पंथाचे लोक येऊन गेले. वारकरी प्रथेला सुविधा देण्याऐवजी या प्रथेला तोडता कसे येईल, याचा प्रयत्न या सरकारने केला आहे. निरर्थक गवगवा सरकार करत आहे. शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले नाही. मुख्यमंत्री तीर्थयात्रा म्हणजे बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी, या सरकारचे वास्तविक दर्शन आम्ही मांडणार आहोत, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे.

सहमतीचे संबंध बलात्कार

होती. त्यामुळे लग्नाचे आमिष दाखवले हा मुद्दा निकालात निघतो. तसेच तक्रारदार महिला ही मुस्लिम आहे, तर प्रियकर हिंदू असल्याने दोघांचे लग्न शक्य नव्हते, असे प्रियकराच्या वकिलाने न्यायालयात सांगितले. तर महिलेच्या वकिलाने वैद्यकीय तपासणीत जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे, असा मुद्दा मांडला.

मुख्यमंत्र्यांनी घेतले ज्ञानोबा

दराडे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, प्रमुख जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन हे उपस्थित होते. यासोबतच नगर परिषदेचे मुख्याधिकारी कैलास केंद्रे, श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त आणि पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजनाथ, विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, गुरु हैबतबाबा यांचे वंशज बाळासाहेब पवार - आरफळकर, ह.भ.प राणा महाराज वासकर, ह.भ.प संग्राम बापू भंडारे महाराज आदी उपस्थित होते. मानाच्या पालखी प्रदक्षिणेनंतर आळंदी संस्थान येथील गांधीवाडा देवस्थानाकडे पालखी सोहळ्याचे मुक्कामासाठी प्रस्थान झाले. प्रस्थान सोहळा याचि देही याचि डोळा अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी आळंदीत दाखल झाले. अर्थसंकल्पीय अधिवेशनात वारकरी महाराष्ट्राची गौरवशाली आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरा असलेल्या पंढरपूर वारीचे जागतिक नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. वारीतल्या मुख्य पालख्यांतील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपयांचे अर्थसाह्य आदी महत्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल वारकरी संत महंत पाईक संघटनांमधील प्रमुख महाराज यांच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी वारकरी संप्रदायातील मान्यवरांसोबत संवाद साधला. वारकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.

'नीट' परीक्षेतील गैरप्रकार गंभीर, दोषींविरुद्ध कठोर कारवाई होणार!

मुंबई प्रतिनिधी

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या 'नीट' परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराची केंद्र आणि राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून, वेगवेगळ्या यंत्रणांकडून कारवाई सुरु आहे. भविष्यात असे गैरप्रकार टाळण्यासाठी केंद्र सरकारने अध्यादेश जारी केला असून दोषींवर कठोर कारवाई होईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेची जबाबदारी पूर्वीप्रमाणे राज्यांकडे सोपविण्याचा प्रस्ताव देण्यात आला असून केंद्र सरकार त्यासंदर्भात तपासणी करुन निर्णय घेणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. नीट परीक्षा घोटाळ्याचे जोरदार पडसाद उमटले. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवर, माजी अध्यक्ष नाना पटोले आदी सदस्यांनी विधानसभेत 'नीट' परीक्षेतील गैरप्रकाराचा मुद्दा स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला होता. अध्यक्षांनी स्थगनला अनुमती नाकारली, पण या गंभीर विषयाकडे लक्ष वेधण्याची परवानगी त्यांना दिली. विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी नीट परीक्षेवरून सरकारला धारेवर धरले. या परीक्षेला महाराष्ट्रात सर्वाधिक विद्यार्थी बसतात. एवढा मोठा घोटाळा होऊन सरकारची भूमिका स्पष्ट नाही. शिक्षण मंत्री म्हणतात काही गडबड झाली आहे. मग सरकार जबाबदारी घेणार आहे की नाही असा सवाल वडेट्टीवार यांनी केला. गैरप्रकार करून प्रवेश मिळवणारे उद्या बोगस डॉक्टर झाले तर लोकांच्या आरोग्याशी खेळ होईल असा इशारा त्यांनी दिला. तर पेपर फुटीमुळे शेकडो होतकरू विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. अशा घटनांना आळा बसावा म्हणून राज्य सरकार पेपर फुटीविरोधात कडक कायदा करावा अशी मागणी नाना पटोले यांनी केली. यावेळी उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकार या विषयांवर अत्यंत गंभीर दोषींवर कठोर कारवाई होईल अशी ग्वाही दिली.परीक्षेतील गैरप्रकाराची केंद्र आणि राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून वेगवेगळ्या यंत्रणांकडून कारवाई सुरु करण्यात आली आहे. दोषींना अटक करण्यात आली आहे. भविष्यात असे गैरप्रकार होऊ नयेत, तसेच दिवसरात्र अभ्यास करून प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी केंद्र सरकारने अध्यादेश जारी केला आहे. त्याद्वारे दोषींवर कठोर कारवाईसह मोठ्या आर्थिक दंडाची तरतूद केली आहे. वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेची जबाबदारी पूर्वीप्रमाणे राज्यांकडे सोपविण्याचा विचारही पुढे आला. केंद्र सरकार त्यासंदर्भात तपासणी करुन निर्णय घेणार आहे. दिवसरात्र अभ्यास करुन प्रामाणिकपणे परीक्षा देणा-या विद्यार्थ्यांचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यासाठी राज्य शासन बांधिल असून यासंदर्भात विरोधी पक्षांनी सूचविलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

टि.सी.हरवला आहे

गौरी मिलिंद उबाळे या नावाचा बारावी विज्ञान पासचा दाखला व मार्क मेमो, नगर नाका रोड ते नवगण कॉलेज रोड परिसरात हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

--:::: संपर्क::::--

मो.८७८८५६२२७७

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ३० जून २०२४

बीडमध्ये चोरीसत्र; चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा

बीड । प्रतिनिधी

शहरातील विविध भागात गत आठ दिवसांपासून चोरी, घरफोडीचे सत्र सुरू आहे. याबाबत पोलीस प्रशासनाने ठोस कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे शनिवारी (दि.२९) केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरात विविध भागात दररोज चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. अक्षरशः नागरीक स्वतः आपापल्या भागामध्ये गस्त घालत आहेत. याकडे लक्ष घालून चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासंदर्भात कार्यवाही करावी. आतापर्यंत नोंद झालेल्या चोरीच्या गुन्ह्यांचा तपास गतीने करण्यासंदर्भात सूचना कराव्यात. तसेच, शहरात पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे. दरम्यान, चोरट्यांचा बंदोबस्त करण्याचे आश्वासन पोलीस प्रशासनाने दिले आहे.

लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे यांच्या जयंती निमित्त बोरफडी व मांजरसुंबा येथे रक्तदान शिबिर

बीड । प्रतिनिधी

लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त बोरफडी व मांजरसुंबा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले . या शिबिरामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदात्यांनी रक्तदान केले.याप्रसंगी शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त संपूर्ण महाराष्ट्रभर विविध लोकोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन केले गेले आहे . राज्यात कृतज्ञता सप्ताह पाळून ठिक -ठिकाणी सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले गेले . यामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप , आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहीम राबवणे, विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकाचे वाटप करणे ,गरजू शेतकऱ्यांना बी- बियाणे वाटप करणे, वृक्षारोपण करणे अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून शिवसंग्रामचे

पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जयंती साजरी केली .

लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेबांच्या जयंतीनिमित्त बोरफडी व मांजरसुंबा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन शिवसंग्रामच्या वतीने करण्यात आले होते.बोरफडी येथे शिवसंग्राम तालुका उपाध्यक्ष सुनील कुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ३४ व मांजरसुंबा येथे माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ६४ रक्तदात्यांनी उत्सस्फूर्तपणे रक्तदान केले . मांजरसुंबा येथील शिबिराचे उद्घाटन शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या हस्ते संपन्न झाले. रक्तदात्यांनी आयोजित रक्तदान शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदात्यांनी रक्तदान केले आणि खऱ्या अर्थाने लोकनेते मेटे साहेबांना या निमित्ताने जयंतीच्या पार्श्वभूमीवर आदरांजली अर्पण केली . मांजरसुंबा येथे बीड पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे,सचिन काळकुटे व गजानन चौधरी,अजिंक्य जगदाळे, अशोक जगताप,शेख नासिर,पठाण तैनूर,उमेश कोकाटे,सखाराम काळकुटे,श्रीराम आप्पा घोडके,नामदेव घोडके, यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले यामध्ये बहुसंख्य लोकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले .या निमित्तने खऱ्या अर्थाने लोकनेते मेटे साहेबांचा वैचारिक वारसा प्रमाणिकपणे चालवण्याचं काम शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी पार पाडले आहे .मांजरसुंबा येथील रक्तदान शिबिरास शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय डॉ. ज्योतीताई मेटे यांनी भेट देत रक्तदात्यांचे आभार व्यक्त केले .प्रसंगी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भा.शि.प्र.संस्था ही त्याग आणि समर्पण याचे मूर्तिमंत उदाहरण आहे.- डॉ.कल्पनाताई चौसाळकर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी गत ७३ वर्षांपासून माणूस घडविण्याची प्रकिया करणारी अंबाजोगाई येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही त्याग आणि समर्पण याचे मूर्तिमंत उदाहरण आहे.असे प्रतिपादन भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्या डॉ.सौ.कल्पनाताई चौसाळकर यांनी केले.

पोखरी येथील लोकमान्य टिळक विद्यालयात दि.२८ जून २०२४ शुक्रवार रोजी संपन्न झालेल्या भा.शि.प्र.संस्थेच्या 'संस्था वर्धापनदिन' प्रसंगी विद्यार्थ्यांसमोर मार्गदर्शन करताना डॉ.चौसाळकर यांनी वरील विचार व्यक्त केले.

संस्थेचा इतिहास मांडताना त्यांनी सर्वांना भारतीय शिक्षणाच्या माध्यमातून माणूस घडविण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या आणि संस्था जडण-घडणात योगदान देणाऱ्या अंबाजोगाई येथील राजाभाऊ चौसाळकर,दत्तोपंत वैद्य,शामराव घोटीकर,मधुकर देशपांडे आदी ध्येयवेड्या शिक्षकांनी केलेला त्याग,समर्पण याची माहिती दिली.

तसेच आजच्या शिक्षक,पालक आणि विद्यार्थी यांनी संस्थेचे ध्येय,धोरण आणि धारणा याचे सिंहावलोकन करून वेळोवेळी संस्थेच्या विकासासाठी कार्यरत रहावे असे आवाहन शेवटी त्यांनी सर्वांना केले. संस्था वर्धापनदिन कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.कल्पनाताई चौसाळकर यांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात सकाळी ७:४०वा संस्थेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.याप्रसंगी श्री.खोलेश्वर जिनियस सी.बी.एस.सी शाळेचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव चौसाळकर,गावचे सरपंच श्रीहरी होळकर,माजी सरपंच विश्वनाथआप्पा निकम, आत्माराम नांदूरकर मुख्याध्यापक ,संजयराव विभूते,ग्रा.प.सदस्य रामलिंग वाघमारे,भास्करराव निकम, महादेव निकम आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते भारतमाता आणि अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे सेवानिवृत्त शिक्षक शामराव तालखेडकर व किशनराव महामुनी यांच्या अमृतमहोत्सव निमित्त ग्रामीण शाळेसाठी ग्रंथतुलेतून प्राप्त झालेला पुस्तकांचा संच डॉ.चौसाळकर यांच्या हस्ते मुख्याध्यापक संजयराव विभूते यांना भेट देण्यात आला. विद्यालयातील सहशिक्षक ज्ञानेश मातेकर यांनी 'संस्था परिचय' दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सहशिक्षक नितीन चौधरी तर आभार प्रदर्शन राकेश मोरे यांनी केले.कार्यक्रमात सर्व विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, पालक, गावातील प्रतिष्ठित यांनी सहभाग घेतला.

जिल्हा प्रशासन व मनस्वीनी प्रकल्प यांच्यावतीने जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालयामध्ये बालविवाह प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम व पालक मेळावा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये बीड जिल्हा प्रशासन व मनस्वीनी प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने पालक व विद्यार्थ्यांसाठी बालविवाह प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम तसेच पालक मेळावा घेण्यात आला.

बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा समजला जातो या जिल्ह्यामध्ये बालविवाहाचे प्रमाण अधिक आहे बालविवाह बाबत जनजागृती होणे गरजेचे असल्याने बीड जिल्हा प्रशासन व मनस्वी प्रकल्प यांच्या अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे मोठे कार्य जिल्ह्यामध्ये

सुरू आहे त्याचाच एक भाग म्हणून धारूर तालुक्यातील गांजपूर येथील जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये बालविवाह प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणामध्ये घेण्यात आला यात जिल्हा प्रशासनाकडून उर्मिला चोपडे व अश्विनी बुरकुले यांनी पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले बालविवाहामुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतात. बालविवाह करू नये मुलीचे वय १८ वर्षे व मुलाचे वय २१ वर्ष झाल्यानंतरच विवाह करण्याचा अनुमती द्यावी त्यामुळे आरोग्य चांगले राहून जीवन सुरळीत होते पालकांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध खेळाच्या माध्यमातून बालविवाह बाबत जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार मुंडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पालक वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे सहशिक्षक नाथा ढगे यांनी केले तर आभार सहशिक्षक हनुमंत काळे यांनी मानले. यावेळी आलेल्या पालकांना जीवन शिक्षण माध्यमिक विद्यालय होत असलेले मॉडेल स्कूल याबद्दल माहिती देण्यात आली पालकांनीही मॉडेल स्कूलची प्रगती पाहून समाधान व्यक्त केले आहे. या कार्यक्रमास विद्यार्थी तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षपदी संतोष सारडा व सचिवपदी संजय सोहनी

बीड । प्रतिनिधी

माहेश्वरी, राजस्थानी समाजात गेल्या ३१ वर्षापासुन विविध समाजोपयोगी उपक्रम घेऊन संपुर्ण महाराष्ट्रात नामांकित असलेल्या महेश सेवा संघाच्या अध्यक्षपदी श्री. संतोष सारडा व सचिवपदी श्री. संजय सोहनी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मंडळाची मासिक बैठक डॉ. संकेत बाहेती यांच्या निवासस्थानी मंडळाचे मावळते अध्यक्ष श्री. प्रदीप मालपाणी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत सन २०२४-२५ च्या नुतन कार्यकारिणीची एकमुखाने निवड करण्यात आली.

श्री. संतोष सारडा व श्री. संजय सोहनी यांचे गेल्या २५ वर्षापासुन सामाजिक क्षेत्रातले योगदान, कामाविषयी तळमळ व नाविन्याची ध्यास या सगळया गोष्टींचा विचार होऊन मंडळातील जवळपास ५० सदस्यांनी एकमुखाने यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

उर्वरीत कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी जगदीश सिकची, अशोक सिकची, कोषाध्यक्षपदी जयकिशोर बियाणी, तर सहसचिवपदी सत्यनारायण करवा यांची निवड करण्यात आली.

जि.प.शाळा गोपाळपूर व युवा ग्राम विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूरमध्ये जागर योजनांचा कार्यक्रम

धारूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोपाळपूर येथे शाळा व युवाग्राम विकास मंडळ यांचे वतीने जागर योजनांचा कार्यक्रम घेण्यात आला. शासनाचे सर्व शैक्षणीक योजनाची माहीती पालकाना देण्यात आली. या योजना चा लाभ कसा घ्यावा या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अशोक मुंडे, प्रमुख उपस्थितीत युवाग्राम प्रकाश काळे संतोष रेपे उपस्थित होते सर्वप्रथम शिक्षण ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. प्रकाश काळे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करत असताना शासनाच्या विविध योजना त्या आपणापर्यंत कशा मिळवता येतील व आपली भूमिका काय असायला हवी याबाबत जमलेल्या पालकांना माहिती दिली. तसेच संतोष रेपे यांनी प्रत्यकक्षात योजनांची प्रामुख्याने माहिती दिली. त्यामध्ये बाल संगोपन योजना,दिव्यांग पेन्शन योजना, लेक लाडकी योजना, उसतोड कामगार हंगामी वसतिगृह, संत भगवानबाबा सामाजिक न्याय वसतिगृह तसेच पालकांसाठी श्रावण बाळ,

संजय गांधी निराधार योजना, आशा योजनांची तपशीलवार माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांसाठी महा डी बी टी ची सविस्तर माहिती दिली.

बालकांसाठी लागू असेलेल्या योजनांची माहिती जिल्हा परिषद शिक्षक श्रीमती सारिका तारसे यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विविध योजनांची व स्पर्धा परीक्षकांची माहिती दिली. लाभार्थी असलेल्या विद्यार्थी व पालक यांना फोर्म भरून देण्यासाठी व योजनेचा पाठपुरावा करण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले. मा. अशोक मुंडे यांनी जमलेल्या पालकांना या शासकीय योजनांचा लाभ घेण्यसाठी जास्तीत जास्त नागरिकांनी अर्ज करावेत असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्र संचालन प्रियांका साठे यांनी केले तर या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका प्रतिभा वरपे, व अन्य जिल्हा परिषद शाळा येथील कर्मचारी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांना महिला कल्याणाच्या गोष्टी कधीच कळल्या नाहीत, सत्ताधाऱ्यांनी मात्र मुख्यमंत्री लाडक्या बहिणीला अर्थसहाय्य केले -राम कुलकर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्यात आणि देशात सर्वाधिक काळ सत्तापदावर असताना शरदचंद्र पवार यांच्यासह काँग्रेसवाल्यांना आणि अलीकडे शिव उबाठा गटाला महिला कल्याणाविषयी कधी काही सुचलेच नाही. मात्र दोन वर्षात राज्यात सत्तेवर असलेल्या शिंदे-फडणवीस-पवार सरकारने महिलांना विकासाच्या प्रवाहात सोबत घेताना त्यांच्यासाठी राज्याची तिजोरीच खुली केली.महिनाकाठी मिळणारे १५०० रूपये हे त्यांच्या स्वावलंबी जीवन जगण्याला फार मोठी उपलब्धी असल्याची प्रतिक्रिया भाजपाचे राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी दिली. अशा गोष्टी पुर्वी सत्तेत असताना विरोधकांना का दिसल्या नाहीत? हा सवाल देखील त्यांनी केला.

प्रसिद्धीपत्रकात त्यांनी म्हटले आहे की, देशाच्या राजकारणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा उदय झाल्यानंतर महिला वर्गाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले. राजकारणासह विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम केवळ भाजपानेच केले. अनादि वर्ष ज्या काँग्रेसवाल्यांनी सत्तापदे भोगली. त्यांनी महिला सन्मानाचा विषय कधीच अजिंड्यावर घेतला नसल्याची टिका त्यांनी केली. मग त्यांना ५० टक्के आरक्षण असो किंवा कल्याणकारी योजना असो. राज्यात असलेल्या महायुतीच्या सरकारने तर माता-भगिनीसाठी तिजोरी खुली करून देताना लाडकी बहिण योजनेद्वारे १५०० रूपये प्रति महा जुलैपासुनच देण्याचा निर्णय काल अर्थमंत्री अजितदादा पवारांनी संकल्पाद्वारे विधानसभेत जाहिर केला. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य व स्वावलंबन आरोग्य पोषणासह सर्वांगिण विकासाच्या कल्याणकारी योजना जाहिर करताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना जाहिर केली. योजने अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील २१ ते ६० वयोगटात पात्र महिलाना शासन आता दरमहा १५०० रूपये देईल. हा निर्णय अतिशय क्रांतीकारी स्वावलंबी बनवणारा आहे. वास्तविक पहाता ज्या मंडळींनी सर्वाधिक सत्ता राज्यात आणि केंद्रात भोगली त्यांनी कधीच महिलांच्यासाठी अशा कल्याणकारी योजना आणल्या नाहीत. माय-बाप सरकार निर्णयक्षम असल्यानंतर सर्वसामान्य लोकांचा फायदा कसा होतो? याचे उत्तम उदाहरण म्हणजे लाडली बहिण होय. सामाजिकदृष्ट्या एकीकडे महिलांना नगण्य स्थान मिळत असताना त्यांची प्रतिष्ठा सन्मान वाढवण्याचे काम सत्ताधारी जेव्हा करतात एव्हाना गरजु आणि आर्थिकदृष्ट्या महिला वर्गांसाठी स्वतंत्र काही योजना जाहिर होते. तेव्हा लक्ष्मीच्या पावली त्या राज्यात आर्थिक सुबत्ता संपत्ती निश्चित वाढु शकते हे मात्र नक्की. शिंदे-फडणवीस-पवार सरकारनी मुख्यमंत्री लाडकी बहिण हातात घेतलेली योजना राज्यातील महिलांच्या जीवनमानासाठी भविष्यकाळात अत्यंत लाभदायक सन्मानपुरक ठरेल यात कुठलीही शंका नाही. केवळ हीच योजना नव्हे तर अर्थसंकल्पात काल आर्थिक स्वातंत्र्य आणि स्वावलंबन आरोग्य यावर आधारीत देखील काही योजना मंजुर झाल्या. राज्यात ६ लाख ४८ हजार महिला बचत गट, त्यात वाढ करण्याचा निर्णय घेतला. बचत गटाच्या फिरत्या निधीच्या रक्कमेत पंधरा हजार रूपये केलेली वाढ आर्थिक सुबत्तेच्या दृष्टीने लाभधारक ठरणार. वर्षाकाठी तीन मोफत सिलेंडर पात्र कुटुंबाला देण्याचाही घेतलेला निर्णय ज्याला अन्नपुर्णा योजना असं नाव दिलं. शिवाय स्वयंरोजगार निर्मितीसाठी महिलांना ई-रिक्षा खरेदी करण्यासाठी ८० हजार कोटी रूपायांची केलेली निधीची तरतुद उपयुक्त ठरण्याचा दावा त्यांनी केला. प्रश्न हाच पडतो की ज्या विरोधकांनी महिलांच्यासाठी काही केलंच नाही तेच आता सरकारनं घेतलेल्या निर्णयाची थट्टा करतात म्हणजे गोरगरिब महिलांचा अपमान केल्यासारखं असल्याची टिका राम कुलकर्णी यांनी केली.

पान ६ वरून...

विवाहित महिलेला जुन्या प्रियकराच्या

मारून जखमी केले.तेव्हा

विवाहित महिला हि घराबाहेर आली असता त्यांच्या भांडणाची सोडवासोडव केली. त्यामुळे त्या सर्वांनी तिलाही शिवीगाळ केली व तिच्या उजव्या साईडचे खांद्यावरील टॉप फाडुन तीचे मनास लज्जा वाटेल असे कृत्य केले व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या.तसेच विवाहित महिलेचा लग्नाअगोदरचा प्रियकर हा तिच्या गल्लीमध्ये जावुन नेहमी त्रास देतो व तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करतो.त्यामुळे फिर्यादी ज्योती चव्हाण यांच्या फिर्यादीवरून १) शिवप्रसाद शिंदे, २) महादेव बाबर, ३) परशुराम सावंत, ४) कल्याण मोरे, ५) अनोळखी (सर्व रा. जिजामाता नगर) व ६) जुना प्रियकर पांडुरंग शिंदे रा. घळाटवाडी) यांच्या विरुद्ध चाकु हाल्ला व विनयभंगासह इतर गुन्हे माजलगाव शहर पोलीसात दाखल करण्यात आले आहेत.

शिक्षकांनी कर्तव्यदक्ष

शालेय व्य. समिती अध्यक्ष नागेश वकरे, पत्रकार नवनाथ कांबळे, बाबासाहेब देशमाने, ॲड. गंभीरे, ठोंबरे, चव्हाण, भुजबळ, केकान, सोळंके, राठोड, देशमाने, पवार, अरबी, सोळंके, कटारे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्रा. (कन्या मुलांची) शाळेचे जेष्ठ शिक्षक महादेव कटारे यांनी ३८ वर्षे केलेल्या सेवेत दिंद्रुड, वांगी व देवदहिफळ येथे कर्तव्य बजावले. यामध्ये त्यांनी श्रीक्षेत्र देवदहिफळ येथे तीन वर्षे शाळेचे मुख्याध्यापक म्हणून तर इतर ठिकाणी सहशिक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंचक सोळंके, मनोहर कटारे यांनी सुत्रसंचलन तर सिध्देश्वर बोकन यांनी आभार मानले. यावेळी परिसरातील सर्व शाळांचे कर्मचारी, मित्र परिवार व ग्रामस्थ उपस्थित होते.

लग्न वाढदिवसानिमित्त

लाट सुरूच आहे.गेल्या काही वर्षात झालेली बेसुमार वृक्षतोड हे यामागील एक मोठे कारण आहे.सद्य परिस्थितीत सर्वांसमोर एकच लक्ष्य असायला पाहिजे.ते म्हणजे झाडे लावणे व ती जगवणे नुसत झाड लावून सोडून देणे आता जमणार नाही.ते झाड योग्य रितीने वाढत आहे की नाही ते पहाव लागेल. असेच बेफिकीर राहिलो तर २०२५ च्या उन्हाळा नुसता असह्य नाही तर उष्माघाताचे बळी जातील बळी.जे आत्ता उत्तर भारतात सुरू आहे.जरा बघा.यावर्षी देवाने किंवा निसर्गाने आपल्या सर्वांना अजून एक संधी दिली आहे अस समजा.सध्या मस्त पाऊस पडायला सुरुवात झाली आहे.स्वतःसाठी,आपल्या येणाऱ्या पिढीसाठी या पावसाळ्यात किमान २ झाडे लावा व त्याचे व्यवस्थित संगोपन करा.अन्यथा अनर्थ अटळ आहे. आम्ही दोघांनी संकल्प केला आम्ही लग्नाच्या वाढदिवसानिमित्त ५ झाडे लावले आहे.झाडे लावा झाडे जगवा आज लग्न वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्यात आली आहे.

कुंडलिक खांडे प्रकरणी

डॉ.मधुसूदन खेडकर,प्रकाश खेडकर,सुरेश उगलमुगले,भागवत वारे,प्रकाश बडे,सावळेराम जायभाये,मच्छिंद्र सानप,कालिदास आघाव,बाळू गर्जे यांच्यासह ओबीसी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दुधाला १० रुपये कायमस्वरुपी अनुदान द्या

५ रुपयाने प्रश्न सुटणार नाही, अर्थसंकल्पावर किसान सभेची टीका

मुंबई : दुधाचे कोसळलेले भाव सावरण्यासाठी किमान १० रुपये प्रति लिटर अनुदान हे कायमस्वरूपी देण्याची आवश्यकता असल्याचे मत किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी व्यक्त केलं आहे. अर्थमंत्री अजित पवार यांनी १ जुलै पासून पुन्हा ५ रुपये अनुदान योजना सुरु करण्याची घोषणा सभागृहात केली आहे. मात्र, मागील अनुभव पाहता केवळ ५ रुपये अनुदानाने दूध दराचा प्रश्न सुटणार नाही ही वस्तुस्थिती असल्याचे नवले म्हणाले.

दुधाला किमान १० रुपये कायमस्वरूपी अनुदान सुरु करण्या सोबतच देशांमध्ये पडून असलेली दूध पावडर निर्यात होण्यासाठी प्रोत्साहन अनुदान देण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारने दूध पावडर आयात करण्याची दिलेली परवानगी मागे घेणेही आवश्यक असल्याचे अजित नवले म्हणाले. राज्यातले सरकार केवळ ५ रुपये अनुदानाची घोषणा करून वेळ मारून नेत आहे. यामुळे प्रश्न अजिबात सुटणार नाही, किंबहुना तो अधिक जटील होत जाणार आहे. मागील वेळी सुद्धा अशाच प्रकारे ५ रुपयाचे अनुदान दिले मात्र त्यामुळे दुधाचे भाव सुधारले नाहीत असे अजित नवले म्हणाले. अटी शर्तींचा परिणाम म्हणून राज्यातील खूपच थोड्या दूध उत्पादकांना अनुदानाचा लाभ मिळाला होता. नव्याने अनुदान सुरू करून पुन्हा त्याच अटी शर्ती लागू झाल्यास पालथ्या घड्यावर पाणीच पडणार आहे. मागील अनुदान काळात संघटित ताकतीच्या जोरावर दूध संघ आणि खाजगी दूध कंपन्यांनी अनुदान मिळत असल्याच्या काळात सुद्धा दुधाचे भाव पाडले होते. अशा पार्श्वभूमीवर दूध उत्पादक शेतकऱ्यांना केवळ ५ रुपये अनुदानाचा तोडगा मान्य नाही. दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समिती आपले आंदोलन सुरूच ठेवणार आहे. महाराष्ट्रात आणि देशभरात साडेतीन लाख टन दुधाची पावडर गोदामांमध्ये पडून आहे. अशा स्थितीत सरकारने १०,००० टन दूध पावडर आयात करण्यासाठी परवानगी दिली आहे. अतिरिक्त दूध उत्पादन झाल्याची आवई उठवून दुधाचे भाव ३५ रुपयावरून पाडून २५ रुपयापर्यंत खाली आणण्यात आलेले आहेत. दूध उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही त्यातून भरून निघत नाही यामुळे दूध उत्पादक महाराष्ट्रभर मेटाकुटीला आलेले आहेत. आंदोलन करून आपल्या मागण्यांकडे ते सरकारचे लक्ष वेधू पाहत आहेत.

दूध उत्पादकांनी आपले आंदोलन अधिक तीव्र करावे

राज्यभरातील दूध उत्पादकांनी आपले आंदोलन अधिक तीव्र करावे व सरकारला दूध क्षेत्रामध्ये शाश्वत सुधारणा करायला भाग पाडावे असे आवाहन दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने केले आहे.

बाजरीचे पेरणी क्षेत्र यंदा घटणार

पुणे : खानदेशात यंदा पेरण्यांची गती चांगली आहे. जूनच्या दुसऱ्या आठवड्यापासून पेरण्या सुरू आहेत. उडीद, मूग, मका, सोयाबीन, तूर, कापूस आदींची पेरणी वेळेत किंवा मुदतीत होत असल्याने बाजरीची पेरणी कमी होईल, असे दिसत आहे. मागील हंगामात किंवा मागील वर्षी जून महिन्यात पावसाचा मोठा खंड होता. जुलैतही हवा तसा व वेळेत पाऊस नव्हता. यामुळे अनेक कोरडवाहू शेतीधारक उडीद, मूग, कापूस आदींची लागवड मुदतीत करू शकले नाहीत. पेरण्या लांबल्याने पुढे कमी कालावधी व कमी पावसात कुठले पीक घ्यावे, असा मुद्दा होता. यातून बाजरीची पेरणी खानदेशात अनेकांनी केली होती. परंतु यंदा पाऊस वेळेत आला आहे. मागील वर्षी जूनमध्ये ४० टक्के क्षेत्रातही पेरण्या झाल्या नव्हत्या. यंदा मात्र या महिन्यात पेरण्या ८० टक्के क्षेत्रात पूर्ण होतील, असे दिसत आहे. पेरण्यांना गती आहे. उडीद, मूग, सोयाबीनची पेरणी बऱ्यापैकी झाली आहे. कापूस लागवडही आटोपत आली आहे. यामुळे बाजरी पेरणीची मोठी निकड किंवा या पर्यायाची निवड शेतकरी यंदा करणार नाहीत, अशीही स्थिती आहे.

मागील हंगामात बाजरीची पेरणी खानदेशात सुमारे १५ हजार हेक्टरवर झाली होती. यंदा ही पेरणी १० ते ११ हजार हेक्टरवर होईल, असे संकेत आहेत. बाजरीकडे नव्याने शेतकरी वळणार नाही. परंपरेनुसार धुळ्यातील साक्री, शिंदखेडा, धुळे, जळगाावातील चाळीसगाव, भडगाव, पारोळा, अमळनेर, नंदुरबारातील नंदुरबार भागात बाजरीची पेरणी होईल. बाजरीची पेरणी अद्याप खानदेशात सुरू झालेली नाही. अनेकांनी पुढील महिन्यात पेरणीचे नियोजन केले आहे. सकस चारा व धान्य आणि कमी खर्च यासाठी बाजरीची पेरणी गिरणा, पांझरा नदीच्या पट्ट्यात केली जाते.

कमी कालावधीच्या वाणांची निवड त्यासाठी शेतकऱ्यांनी केली आहे. बाजरी पेरणीसंबंधीचे क्षेत्र पेरणीसाठी तयार आहे. त्यात पूर्वमशागत करून घेतली आहे. खानदेशात जुलैच्या पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात अनेक शेतकरी बाजरीची पेरणी करतील, असे दिसत आहे. तापी व अनेर पट्ट्यात काही शेतकरी केळी, पपईसाठी बेवड म्हणूनही खरिपातील बाजरीची पेरणी करतात.

बाजरीची फक्त कणसे खुडून मळणी करून घेतात. चारा किंवा अवशेष तसेच जमिनीत गाडतात. यामुळे सेंद्रिय कर्ब कायम राखण्यास मदत होते. केळी पीक जोमात येते, असे शेतकरी मानतात.

राज्य शासन राबवविणार 'वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र अभियान'

वृक्ष लागवडीत अग्रेसर ठरणाऱ्या ग्रामपंचायतींचा होणार सन्मान

पुणे : राज्यात वनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र अभियानांतर्गत पावसाळ्यात वृक्ष लागवड मोहीम राबवण्यात येत आहे. सर्वाधिक वृक्ष लागवड व संवर्धन करणाऱ्या ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक व सदस्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे.

तालुका स्तरावर दर महिन्यास सर्वाधिक वृक्ष लागवड करणाऱ्या पहिल्या तीन ग्रामपंचायतींचा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. जिल्हा परिषद स्तरावर दर महिन्यास सर्वाधिक वृक्ष लावणाऱ्या ग्रामपंचायतींचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सन्मान होणार आहे. तसेच जिल्हा स्तरावर डिसेंबर अखेरीस संपूर्ण सर्वाधिक वृक्ष लागवड व संवर्धन करणाऱ्या प्रथम, द्वितीय, तृतीय ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामसेवक व सदस्यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी सन्मान होणार आहे.

निवडीसाठी निकष : या अभियानासाठी काही निकष ठरवण्यात आलेले आहेत ते खालील प्रमाणे : किमान नऊ महिन्यांच्या रोपांचा वापर करावा. ट्री कॉरिडॉर, मियावाकी व बिहार पॅटर्न पद्धतीने आणि सर्वाच्या सहभागातून लागवड करावी. संवर्धनासाठी वृक्षांना कुंपण, जाळी लावावी. संवर्धनाचे प्रमाण शंभर टक्के असावे. पाण्याची यथायोग्य व्यवस्था असावी. वृक्षांना क्रमांक द्यावेत. लागवड व संगोपनासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. ग्रामपंचायतीत वृक्ष लागवडीचे रेकॉर्ड ठेवलेले असावे.

रोग-किडींना प्रतिकारक सोयाबीनचे दोन नवीन वाण विकसित

सोयाबीनचे दोन नवीन वाण आता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी विकसित करण्यात आलेले आहेत. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत प्रादेशिक संशोधन केंद्र अमरावती यांनी दोन नवीन सोयाबीन वाण विकसित केले आहेत. हे वाण कमी कालावधीत उच्च उत्पादन देतात आणि विविध रोग आणि किडींना प्रतिरोधक आहेत. जाणून घेऊ या नवीन वाणाचे वैशिष्ट्ये.

सोयाबीनचे नवीन विकसित वाण : पीडीकेव्ही अंबा - लवकर काढणीस येणारे (९४ ते ९६ दिवसात). जास्त उत्पादन क्षमता (हेक्टरी २८ ते ३० क्विंटल). तीन दाण्यांच्या शेंगांचे प्रमाण व दाण्याचे वजन जास्त. तेल आणि प्रथिनाचे प्रमाण जास्त. हवामान बदलाचा फारसा परिणाम होत नाही. मुळकुज/खोडकुज, चक्रभुंगा आणि खोडमाशी यांना मध्यम प्रतिकारक. परिपक्व झाल्यानंतर १० ते १२ दिवसांपर्यंत शेंगा फुटत नाहीत

सुवर्ण सोया : बुरशीजन्य रोगांना प्रतिरोधक. शेंगांवर आणि झाडांवर लव असल्यामुळे किडींना प्रतिरोधक. संपूर्ण भारतात मुळकुज/खोडकुज या रोगास प्रतिकारक्षम. इतर वाणांपेक्षा २२ टक्के जास्त उत्पादकता. शेंगांची संख्या जास्त. परिपक्वतेचा कालावधी ९८ ते १०२ दिवस. सरासरी उत्पादकता हेक्टरी २४ ते २८ क्विंटल. मुळकुज/खोडकुज, पानांवरील बुरशीजन्य ठिपके यांना प्रतिकारक. चक्रभुंगा आणि खोडमाशीला मध्यम प्रतिकारक. परिपक्व झाल्यानंतर १० ते १२ दिवसांपर्यंत शेंगा फुटत नाहीत.

काय आहेत या नवीन वाणांचे फायदे : कमी कालावधीत जास्त उत्पादन देणाऱ्या या वाणात चांगल्या दर्जाचे तेल आणि प्रथिने देण्याची क्षमता आहे. विविध रोग आणि किडींना प्रतिरोधक असून हवामान बदलाशी जुळवून घेण्याची क्षमता आहे. कृषी विद्यापीठाने शेतकऱ्यांना या नवीन सोयाबीन वाणांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. या वाणांमुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पादन आणि चांगले उत्पन्न मिळू शकेल.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८५९ : चार्ल्स ब्लांडिन यांनी नायगारा धबधबा एकादोरीबारून कसरत करीत पार केला.
१९३७ : जगातील पहिला तत्काळ दूरध्वनी क्रमांक ९९९ लंडनमध्ये सुरु करण्यात आला.
१९४४ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमात 'प्रभात'चा 'रामशास्त्री' हा चित्रपट रिलीज झाला. या चित्रपटात ललिता पवार या अभिनेत्रीवर खलनायिकेचा कायमचा शिक्का बसला.
१९६० : काँगोला (बेल्जियमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९६५ : भारत व पाकिस्तानमध्ये कच्छचा करार झाला.
१९६६ : कोका सुब्बा राव यांनी भारताचे ९ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९६६ : अमेरिकेची सर्वात मोठी स्त्रीवादी संस्था नॅशनल ऑरगनायझेशन फॉर वुमन ची स्थापना झाली.
१९७१ : सोयुझ-११ या रशियन अंतराळयानात बिघाड होऊन तीन अवकाशवीर ठार झाले.
१९७८ : अमेरिकेच्या संविधानात २६ वा बदल संमत झाला त्यामुळे मतदानाचे वय १८ वर्षे झाले.
१९८६ : केन्द्र सरकार व मिझो नॅशनल फ्रंट यांच्यात करार होऊन मिझोरामला राज्याचा दर्जा देण्याचे ठरले.
१९९७ : ब्रिटनने चीनकडुन ९९ वर्षांच्या भाडेपट्ट्याने घेतलेल्या हाँगकाँग बेटांच्या भाडेपट्ट्याची मुदत संपल्याने ब्रिटनने हे बेट समारंभपूर्वक चीनला परत दिले.
२००० : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बील क्लिंटन यांनी अमेरिकेत डीजीटल हस्ताक्षर करण्यास वैध रित्या परवानगी दिली.
२००२ : ब्राझीलने फुटबॉल विश्वकप जिंकला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७० : चार्ल्स (आठवा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ७ एप्रिल १४९८)
१९०३ : भारतीय राजकारणी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस राजकीय पक्षाचे सदस्य मुकुट बिहारी लाल भार्गव यांचा जन्मदिन.
१९११ : साहित्य अकादमी चे फेलोशिप प्राप्त भारतीय साहित्यकार नागार्जुन यांचा जन्मदिन.
१९१९ : हॉट एअर बलूनचे निर्माते एड यॉस्ट यांचा जन्म: (मृत्यू: २७ मे २००७)
१९२८ : कल्याणजी वीरजी शाह सुमारे तीन दशके रसिकांवर आपल्या सुरावटीची मोहिनी घालणार्या 'कल्याणजी-आनंदजी' या संगीतकार द्वयीतील ज्येष्ठ बंधू (मृत्यू: २४ ऑगस्ट २०००)
१९३४ : भारतीय रसायनशास्त्रज्ञ चिंतामणी नागेश रामचंद्र राव यांचा जन्म.
१९४३ : सईद मिर्झा दिग्दर्शक आणि पटकथालेखक
१९५४ : डॉमिनिकाचे पंतप्रधान पिएर चार्ल्स यांचा जन्म.
१९५९ : भारतीय-इंग्लिश उद्योगपती आणि राजकारणी संदीप वर्मा यांचा जन्म.
१९६६ : माईक टायसन अमेरिकन मुष्टीयोद्धा
१९६९ : सनत जयसूर्या श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९७३ : भारतीय क्रिकेट खेळाडू दोड्डा गणेश यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५७ : शाही डोगरा राजवंशाचे संस्थापक आणि जम्मू-काश्मीर राज्याचे पहिले महाराजा तसचं, ब्रिटीश भारतातील दुसर्या क्रमांकाचे सर्वात मोठे रियासतदार महाराजा गुलाबसिंह जामवाल यांचे निधन.
१९१७ : पितामह दादाभाई नौरोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक आणि राजकीय व सामाजिक नेते, ब्रिटिश संसदेचे सदस्यत्त्व मिळवणारे पहिले भारतीय (जन्म: ४ सप्टेंबर १८२५)
१९१९ : नोबल पारितोषिक विजेता ब्रिटीश भौतिकशास्त्रज्ञ जॉन विलियम्स स्ट्रट रेले यांचे निधन.
१९९२ : डॉ. वसंत कृष्ण वराडपांडे साहित्यिक, वक्ते व समीक्षक (जन्म:)
१९९४ : बाळकृष्ण हरी तथा 'बाळ' कोल्हटकर नाटककार, कवी, अभिनेते, निर्माते, लेखक व दिग्दर्शक (जन्म: २५ सप्टेंबर १९२६)
१९९७ : राजाभाऊ साठे शास्त्रोक्त व नाट्यसंगीत गायक, यांनी २५ वर्षे कै. राम मराठे यांच्याबरोबर संगीत सौभद्र नाटकात श्रीकृष्णाची भूमिका केली होती.
१९९९ : कृष्णा बळवंत तथा कृ. ब. निकुंब सहजसुंदर काव्याविष्काराचा प्रत्यय घडवणारे मराठी काव्यसृष्टीतील कवी (जन्म:)
२००७ : दिल्लीचे चौथे मुख्यमंत्री साहिबसिंह वर्मा यांचे निधन. (जन्म: १५ मार्च १९४३)
२००८ : भारतीय पंजाब राज्यातील प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक आणि राजकारणी केवल कृष्ण यांचे निधन.

तृण धान्याच्या पानांवरील भूंगेरे : कीड आणि रोग

बिटल्सना ओट्स, जव, आणि राय सारखी धान्य फार आवडतात पण त्याचे आवडते यजमान गहू आहेत. मका, ज्वारी आणि गवतासारखे ह्याचे पर्यायी यजमानही पुष्कळ आहेत. अळ्या पानाच्या वरच्या भागाची त्वचा खातात आणि त्यामुळे पूर्ण जीवनचक्राला मुख्य नुकसान करतात. त्यांच्या खाण्याचे वैशिष्ट्य आहे की, पानांचे भाग खालच्या भागापर्यंत खातात ज्यामुळे पातळ, लांब, पांढरे व्रण किंवा रेषा दिसतात, जर संक्रमण खूपच जास्त झाले असेल तर रेषांची संख्याही खूप जास्त असते. तरीपण प्रौढ बीटल्स खात-खात इतर रोपांवर किंवा शेतात पसरतात, म्हणजे एकाच शेताला गंभीर नुकसान क्वचितच होते. दुरुन पाहिले असता, शेताचा प्रभावित भाग पिकल्यासारखा आणि जुना दिसतो पण एकुण भागाच्या ४०%वर नुकसान जात नाही. काही धान्य लागवडीच्या भागात हे बीटल्स पिकावरील महत्वाचे आणि कायमचे उपद्रव आहेत. जैविक नियंत्रण : स्टेनेर्नेमा जातीचे काही सूत्रकृमीही जमिनीत विश्रांती घेत असलेल्या प्रौढांवर हल्ला करतात, ज्यामुळे ते वसंतात परत येऊ शकत नाहीत. तरीपण त्यांची परिणामकारकता ही तापमानावर अवलंबुन असते. काही लेडीबग्जही अळ्या आणि अंड्यांना खातात. ताचिनिड माशी ह्यालोमायोडस ट्रायन्युलिफर माशाही प्रौढांना खातातआणि ओ. मेलानोपसच्या संख्या नियंत्रणासाठी बाजारात उपलब्ध आहेत. डायापारसिस कारनिफर, लेमोफॅगस कर्टिस आणि टेट्रास्टिचस जुलिस हे परजीवी वॅस्पही अळ्यांचे नियंत्रण करतात. शेवटी ॲनाफेस फ्लॅव्हिपेस वॅस्पस अंडी खातात आणि चांगले नियंत्रक एजंट आहेत.

रासायनिक नियंत्रण : नेहमी एकात्मिक दृष्टीकोन ठेवा म्हणजे प्रतिबंधक उपायांबरोबरच उपलब्ध असल्यास जैविक उपचार पद्धतीचा वापर करा. गॅमासिहॅलोथ्रिन हा सक्रिय घटक असलेली कीटनाशके ह्या उपद्रवावर सगळ्यात जास्त परिणामकारक आहेत कारण ही अंडी आणि अळ्या दोघांनाही प्रभावित करतात. जेव्हा प्रौढ अंडी घालत असतात किंवा ५०% अंडी ऊबलेली असतात तेव्हाच फवारे मारावेत. गैरवापराने ओ. मेलानोपसची संख्या वाढते कारण शिकारीही मारले जातात. ऑरगॅनोफॉस्फेटस (मॅलॅथियॉन) आणि पायरेथ्रॉइडस कुटुंबातील इतर कीटनाशकेही ओ. मेलानोपस विरुद्ध वापरली गेली आहेत.

कशामुळे झाले : औलेमा मेलानोपस नावाच्या बीटलच्या अळ्यांमुळे नुकसान होते. प्रौढ सुमारे ५ मि.मी. लांब असून, डोके आणि पाय लाल असतात आणि पंख गडद निळे असतात. ते शेताच्या बाहेरच्या कडांना पसरतात आणि कुंपण, रोपांचे अवशेष आणि झाडाच्या सालीच्या फटीसारख्या सुरक्षित जागी विश्रांती घेतात. वसंतात जेव्हा तापमान सुमारे १० डिग्री सेल्शियस असते तेव्हा हे परत येतात. ऊबदार वसंत ऋतु ह्यांच्या जीवनचक्राला अनुकूल आहे, तर थंड हवामान बाधा करते. संभोगानंतर माद्या चकचकीत पिवळी दंडगोलाकार अंडी पानांच्या खालच्या बाजुला, मध्य शिरेच्या बाजुने घालतात आणि फार काळासाठी (४५-६० दिवस) घालतच रहातात. ७-१५ दिवसांनी अळ्या बाहेर येतात आणि पानाच्या वरच्या बाजुची त्वचा खायला लागतात, ज्यामुळे फार नुकसान होते. त्या पांढर्या किंवा पिवळ्या, पाठीवर उंटासारखी मदार असलेल्या, काळे डोके आणि सहा छोटे पाय असलेल्या असतात. २-३ अठवडे खाल्यानंतर जेव्हा त्या वयात येतात तेव्हा कोषात जातात आणि प्रौढ बीटल्स सुमारे २०-२५ दिवसांनी बाहेर येतात आणि जीवनचक्र पुन्हा चालू होते. प्रतिबंधक उपाय : प्रतिकारक वाण लावा. भागात किंवा देशातील क्वारंटाइन नियम तपासा. वसंताच्या सुरवातीला जेव्हा तापमान चढु लागते तेव्हा शेताचे नियमित निरीक्षण करा.

खामगाव- पंढरपूर पालखी मार्गावरील भेगा बुजवणार कधी?

बीड । प्रतिनिधी

केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांनी पंढरपुरच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी विदर्भ आणि मराठवाड्यातुन जाणाऱ्या १५० पालख्यांचा प्रवास सुखकर व्हावा भाविकांची सोय व्हावी यासाठी २ हजार कोटी रुपये खर्चून ४३० किलोमीटर लांबीचा शेगाव ते पंढरपूर ही राज्यातील दोन मोठी देवस्थाने जोडणारा दिंडी महामार्ग खामगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाला मंजुरी देण्यात आली होती.बीड जिल्ह्यातील माजलगाव, धारूर,केज या ३ तालुक्यातुन ६० किलोमीटर लांबीचा राष्ट्रीय महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत करण्यात आला असुन यातील माजलगाव ते तेलगाव २० किलोमीटर अंतरावर मागील ४ वर्षात २८४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.मात्र अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम झाल्याने माजलगाव ते तेलगाव दरम्यान मोठमोठ्या भेगा पडल्या असुन या भेगात पाय अडकुन गंभीर दुखापत होऊ शकते.दुचाकी वाहनांचे चाक अडकून अपघातांच्या घटनात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असुन कित्येक जणांचे जाग्यावरच बळी गेले आहेत तर काहीजण दवाखान्यात उपचार घेत असताना मृत्युमुखी पडले आहेत. तर काहींना कायम स्वरूपी अपंगत्व आलेले आहे. एवढेच नाहीतर महामार्गास दुतर्फा लहान मोठ्या बाभळीच्या झुडुपांनी वेढा घातला असुन झुडुपे रस्त्यावर आल्याने वळणा-याला विरूद्ध दिशेने येणारे वाहन दिसत नाही.त्यामुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे मात्र झुडुंपांची साफसफाई करण्याचे कष्ट महामार्ग प्राधिकरणचे अधिकारी, कर्मचारी घेताना दिसत नाहीत.आषाढी वारीला सुरूवात झाली असुन पालख्या पंढरपूरच्या दिशेने रवाना झालेल्या असताना पालखी मार्ग म्हणून आषाढीला जाणाऱ्या भाविकांची सोय व्हावी म्हणून उभारण्यात आलेल्या महामार्गावरील भेगा बुजणार कधी ?? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला असुन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे.तातडीने महामार्गावरील भेगा बुजविण्यात याव्यात अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.





निवेदने फोटोसेशन पुरतीच मर्यादित : माजलगाव ते तेलगाव दरम्यान रस्ता दुरुस्तीसाठी सामाजिक संघटना तसेच सर्वपक्षीय यांनी निवेदन तसेच रास्तारोको आंदोलने केली तसेच नुकत्याच लोकसभेच्या प्रचारासाठी माजलगाव येथे आलेल्या केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीनजी गडकरी यांची व्यापारी संघटना, सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे महामार्गाच्या दुरूस्तीची मागणी केली मात्र त्यांची भेट म्हणजे केवळ फोटोसेशन ठरले असुन अद्याप दुरुस्ती करण्यात आली नाही.

अपघातात बळी गेलेल्यांचे सोयरसुतक नाही

पालखी महामार्ग सिमेंट क्रांक्रिटचा उभारण्यात आला असुन काळ्या मातीचा भाग असलेल्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना करण्यात न आल्याने दोन वर्षातच महामार्गाला मोठमोठ्या भेगा पडल्या असुन दुचाकी वाहनांचे चाक अडकून अपघाताचे प्रमाण वाढले आहे.राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाचे शाखा अभियंता अतुल कोटेचा मात्र भेगा का पडल्या असे विचारले असता माहीत नाही असे उत्तर देतात तर महामार्गाची दुरूस्ती करण्यात येईल असे उत्तर देऊन वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करत असुन एकंदरीतच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला याचे गांभीर्य दिसून येत नाही.

थोडक्यात

रामकृष्ण रंभाजी मिसाळ यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा

रायमोहा : अंतर्गत येणा-या दगडवाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे सहशिक्षक रामकृष्ण मिसाळ सर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता त्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विकास डोळे,सर तर शुभ आशिर्वाद ह भ प अतुल महाराज शास्त्री यांनी दिले कार्यक्रमास चंद्रशेखर केकान साहेब,माजी जिल्हा परिषद सदस्य वैजिनाथराव मिसाळ, माजी सभापती सुधाकर आप्पा मिसाळ ,सरपंच श्रीहरी भाऊ मिसाळ,गट शिक्षण अधिकारी जमीर शेख साहेब, नरेगा बी डी ओ सचिन सानप,गोरक सानप,गोकूळ सानप,रायमोहाकर, विजयकुमार जायभाये,सर्व मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका ,शिक्षक,शिक्षिका ग्रामस्थ विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थितीत होत कार्यक्रमानंतर सर्वांना स्नेहभोजन देण्यात आले कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व्हि के मिसाळ यांनी केले तर आभार मोहन जायभाये यांनी मानले.

बीड मतदार संघातील शिवसैनिकांनी कामाला लागावे-सुनील सुरवसे

बीड : येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी पाहता अनिल दादा जगताप हा चेहरा जनतेच्या नजरेत बसला आहे त्याचे कारण असे आहे की मराठा आरक्षणाला पाठिंबा देणे, सामाजिक कार्यात सहभागी होणे अनिल जगताप यांच्या जमेच्या बाजू अनिल जगताप यांनी आतापर्यंत अनेकदा अनाथ, आत्महत्याग्रस्त ,शेतकरी ,कलावंत ,गोर गरीब मुले ,एखाद्या आ डकलेल्या विद्यार्थ्यांचे ऍडमिशन यासाठी तळागाळात जाऊन तात्काळ मदत केली आहे तसेच जनतेसाठी रात्री अपरात्री कोणत्याही वेळी ते मदतीला धावून गेल्याचे अनेकांनी पाहिले आहे मुस्लिम समाजात देखील त्यांची सामाजिक कार्यामुळे क्रिकेटच्या स्पर्धेला पाठबळ दिल्यामुळे एक वेगळीच क्रेझ आहे. अनिल जगताप यांनी मराठा क्रांती मोर्चा ला तसेच मराठा आरक्षणाला पाठिंबा दिला होता याचा फायदा देखील विधानसभेत भेटू शकतो म्हणून बिडकाराने ठरविले आहे अनिल दादा जगताप यांचा चेहरा समोर ठेवून विधानसभा निवडणूक ही अनिल दादा जगताप यांनीच जिंकली पाहिजे यासाठी विधानसभेतील सर्व मतदार यांनी व शिवसैनिकांनी आपापले प्रभाग, आपापल्या वाड्या ,वस्त्या, गाव ,सर्कल या ठिकाणी शिवसैनिक सज्ज करावे यांना विधानसभेवर निवडून आणण्याचे काम जिम्मेदारीने करावे असे आव्हान शिवसेनेचे जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांनी पत्रकात नमूद केले

कृषीमंत्री पदाचा वापर करुन पीकविमा नुकसान भरपाईचे ६८ कोटी रुपये व्याजासह द्यावेत

शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांचे आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी कृषीमंत्रीपदाचा वापर करुन सन २०१८ सालातील परळी,धर्मापूरी आणि घाटनांदूर येथील बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखाधिकाऱ्यांनी परत पाठविलेली सोयाबीनची पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम सुमारे ६८ कोटी रुपये व्याजासहित शेतकऱ्यांना द्यावी. तसेच धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील शेतकऱ्यांप्रमाणे सन २०२० सालातील पीक विमा नुकसान भरपाईची रक्कम वाटप करावी. असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केले आहे.

पंकजा गोपीनाथराव मुंडे बीडच्या पालकमंत्री असताना सन २०१८ साली बीड जिल्ह्यात सोयाबीनला विक्रमी पीक विमा नुकसान भरपाई मंजूर झाली होती. मात्र परळी वैजनाथ, धर्मापूरी आणि घाटनांदूर येथील बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. पुणे यांनी सुमारे ६८ कोटी रुपये जमा केले असतानाही पैशाचे वाटप न करता शेतकऱ्यांनी वेगवेगळ्या बँकेत एकाच सात बारावर अनेक वेळा पीक विमा भरल्याचा 'बोभाटा' करून ही रक्कम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीला परत केली. राष्ट्रियीकृत, ग्रामीण, खाजगी बँकांनी मात्र ही रक्कम वाटप केली तरिही.बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या परळी, धर्मापूरी आणि घाटनांदूर शाखाधिकाऱ्यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार सुमारे ६८ कोटी रुपये ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीला परत पाठविले.त्यावेळी बीडच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे होत्या.तसेच बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकही त्यांच्याच ताब्यात होती. सध्या धनंजय मुंडे राज्याचे कृषिमंत्री आहेत.त्यांनी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीला आदेश दिल्यास ही शेतकऱ्यांच्या हक्काची रक्कम शेतकऱ्यांना सहजपणे व्याजासह मिळणार आहे.पंकजाताई आणि धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे मिळवून द्यावेत अशी विनंती कालिदास आपेट यांनी केली आहे.

याबाबत राज्याचे कृषी आयुक्त यांच्याकडे शेतकरी संघटनेच्या तक्रारीवरून अनेक बैठका झाल्या आहेत.बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी एकाच क्षेत्रावर अनेकदा पीक विमा भरल्याचा आक्षेप घेण्यात आला. त्यास शेतकरी संघटनेच्या वतीने रघुनाथदादा पाटील, कालिदास आपेट यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला. शेतकऱ्यांनी पीक विम्याचा हप्ता भरल्यानंतर राज्य आणि केंद्र सरकारने त्यांच्या हिश्याची रक्कम भरली असल्याने शेतकऱ्यांनी एकाच क्षेत्रावर अनेकदा पीक विमा काढल्याचा आक्षेप गैरलागू आहे. पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केल्यानंतर शेतकऱ्यांवर असे आरोप करणे चुकीचे आहे. राष्ट्रीयकृत, ग्रामीण आणि खाजगी बँकांनी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडून जमा झालेले पैसे वितरित करून टाकले. केवळ बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेने पिक विमा नुकसान भरपाईची सुमारे ६८ कोटी रुपयाची रक्कम विमा कंपनीला परत पाठविली. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी संबंधित रकमेला व्याज लावून शेतकऱ्यांना ती रक्कम वाटप करण्याचा आदेश द्यावा.तसेच सन २०२० सालातील पिक विमा नुकसान भरपाई बाबत धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील आमदार राणा जगजीत सिंह आणि कैलास पाटील यांनी सुप्रीम कोर्टाकडून न्याय मिळविला आहे. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाही तोच न्याय लावून कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी भारतीय कृषी विमा कंपनीला आदेशित करून सन २०२० सालातील पीक विमा उतरलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा. अशी विनंती शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केली आहे.

वीज ग्राहकांना विजेचा शॉक देण्याचा प्रयत्न- प्रा.मोराळे

बीड । प्रतिनिधी

महावितरण कंपनीने स्मार्ट प्रीपेड मीटरचे योजना महाराष्ट्रात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. टप्या टप्प्यात हे मीटर घरात शेतात बसणार आहेत. आयोगाच्या आदेशानुसार वीजदरवाढींच्या रूपाने १ एप्रिल २०२५ पासुन ही योजना राबविली जाईल. ही योजना वीज ग्राहकांना विजेचा शॉक देण्यासारखी आहे. ही लागू करू नये अशी मागणी वीज ग्राहक संघटनेच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली आहे. पूर्वीप्रमाणेच पोस्टपेड मीटर मार्फतच ही योजना सुरू ठेवावी अशी मागणी वीजग्राहक संघटनेच्या वतीने प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केली आहे.

वीज कायदा २००३ मधील अधिनियम क्रमांक ४७ (५) अन्वये कोणता मीटर वापरायच याचे स्वातंत्र्य व मीटरची निवड करण्याचे सर्व कायदेशीर हक्क सबंधित वीजग्राहकांना आहेत. परंतु कंपनी अघोषित सक्ती करून ग्राहकांच्या हक्काचे उल्लघंन करीत आहे. ग्राहक म्हणून आमच्या कायदेशीर हक्काचे रक्षण करणे हा आमचा अधिकार आहे. महावितरण कंपनीने मंजूर केलेल्या टेंडर नुसार मीटर्सचा खर्च १२,०००/- रुपये प्रति मीटर आहे. प्रीपेड मीटरसाठी केंद्र सरकारने ९०० रुपये अनुदान दिले आहे. म्हणजे ११,१००/- रुपये इतका बोजा ग्राहकांवर कर्ज टाकून काढला जाणार आहे. या कर्जाला आमचा विरोध आहे. तसेच या कर्जामुळे व्याज, घसारा व खर्च वसूल करण्यासाठी वीज दरात वाढ होणार ग्राहकांना हा बोजा आम्हाला मान्य नाही. या प्रश्ननांसाठी जनजागृती करून जनतेला रस्त्यावर उतरवीण्याचे काम वीजग्राहक संघटना करणार आहे. आमच्या मागणीला कंपनीने सकारात्मक बघावे नसता रस्त्यावर उतरून संघर्ष करू असे प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

स्व.विनायक मेटे यांच्या जयंतीनिमित्त हिवरसिंगा येथे विविध कार्यक्रम

शिरूर । प्रतिनिधी

लोकनायक स्व.विनायकरावजी मेटे यांच्या जनसेवेचा वारसा चालवत शिवसंग्राम च्या माध्यमातून राज्यभरात कृतज्ञता सप्ताह निमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम कार्यक्रम राबवले जात आहेत त्या निमित्ताने हिवरसिंगा येथे विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रम-बक्षीस वितरण,लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे व लोकनायक स्व.विनायकरावजी मेटे साहेबांच्या प्रतिमा भेट, वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्षा ज्योती शिंदे, उज्वला शिंदे, तर प्रमुख अतिथी डॉ.ज्योती विनायकराव मेटे, गोपीनाथराव घुमरे, पंडीत माने, मुकिंद गोरे, ज्ञानदेव सानप, दत्तात्रय शिंदे, माऊली शिंदे,प्रभाकर डोंगरे, भिमराव सानप,राजेंद्र दुधाळ,विजय हतागळे, अशोक शिंदे हे होते.तर विशेष उपस्थिती प्रभाकर मिसाळ हे होते.यावेळी जि.प.के.प्रा.शाळा हिवरसिंगा मधील इ१ ली ते ७वी तसेच मंथन व बी.टि.एस.स्पर्धा परिक्षा मधील उतिर्ण विद्यार्थी, तसेच मानुरकर महाराज माध्यमिक विद्यालय मधील इ.८ वी ते १० व इश्वरी कॉम्प्युटर मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित स्पर्धा मधील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्राफी व बक्षीस वितरण करण्यात आले.

ग्रामपंचायत कार्यालय आवारात विविध फळझाडे उपस्थित मान्यवर लागवड करण्यात आली. अशा विविध उपक्रमातून स्व.विनायकराव मेटे साहेबाना जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी सुत्रसंचलन शिवराम राऊत तर आभार रामेश्वर पांडुळे यांनी व्यक्त केले.प्रसंगी डिंगाबर दुधाळ, गोपीनाथ शेळके, सुभाष सानप, प्रल्हाद सानप,राम मस्कर,सावता दुधाळ,अंलिम शेख,किशोर सानप, चद्रकांत दुधाळ, सिध्देश्वर दुधाळ,केतन गायकवाड,विजय शिंदे, गणेश सानप, अभिजित सानप, गोवर्धन गरत, सिध्देश्वर दुधाळ, संतोष गायकवाड, अशोक कुटे,रवी दुधाळ,भिकाजी गायकवाड, हनुमान ढोंबळे, ऋषिकेश तिंकाडे, श्रीनिवास राऊत,अंतिम शेख, सह कदम, मेहेत्रे, विकास औसरमल, नवनाथ दुधाळ सह विद्यार्थी पालक, महिला,ग्रामस्थ, ग्रामपंचायत पदाधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त सामुदायिक अभिवादन कार्यक्रम

मनोज जरांगे पाटील यांच्यासह अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर यांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त कृतज्ञता सप्ताह संपन्न होत आहे. यात रक्तदान शिबिराबरोबरच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांचे मुलांचे शैक्षणिक पुनर्वसन, वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन आणि शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांसाठी विशेष योजना अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. हा सप्ताह आम्ही विविध संघटनांना सोबत घेऊन राबवला. याची सांगता येत्या ३० जून रविवार रोजी स्व. विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती दिनी सकाळी ११:०० वाजता लोकनेते विनायकराव मेटे साहेब स्मृती स्थळ, कॅनॉल रोड बीड येथे होणार आहे. त्याचबरोबर या ठिकाणी सामुदायिक अभिवादन करण्यात येणार आहे. याप्रसंगी मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठवाडा गौरव पुरस्कार प्राप्त अभिनेत्री प्रतीक्षा लोणकर यांची उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी दिली.

बीड येथील शिवसंग्राम कार्यालयात शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. याप्रसंगी शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे, अनिल घुमरे, नारायण काशीद, सुहास पाटील, गोपीनाथ घुमरे, मनोज जाधव आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या, दरवर्षी लोकनेते विनायक मेटे यांचा वाढदिवस विविध समाज उपयोगी उपक्रमांनी साजरा व्हायचा. त्यांच्या विचारांचा वसा आणि वारसा पुढे घेऊन जाण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत आणि या प्रयत्नांना चांगले यश येत आहे हे आमच्यासाठी खूप सकारात्मक आहे. वृक्ष लागवडीमध्ये नारळ आणि केशर झाड लागवडीचा उपक्रम यंदा आम्ही हाती घेतला आहे. उद्या मांजरसुंबा येथे रक्तदान शिबिर संपन्न होत आहे. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाचे शैक्षणिक पुनर्वसन आम्ही केले, हे आमच्या या सप्ताहाचे सर्वात मोठे यश आहे. बीडमध्ये पोलीस भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारासाठी भोजन व्यवस्था केली आहे. काही वर्षांपूर्वी पुण्यात एमपीएससी परीक्षेसाठी येणाऱ्या मुलांना रविवारी मेस बंद असल्याने मेटे साहेबांनी मुलांसाठी मोफत भोजन व्यवस्था केली होती. तसेच स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन सत्र ते आयोजित करायचे. तिथे मी मार्गदर्शन करण्यासाठी गेलेले आहे. त्यावेळीची आता आठवण येत असल्याचेही डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या. त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी शिवसंग्राम कार्यालयात मोफत पीक विमा अर्ज भरून घेण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांनी यासाठी आवश्यक कागदपत्रे घेऊन यावे असेही याप्रसंगी डॉ. ज्योतीताई मेटे यांनी सांगितले. लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त यंदा आयोजित कृतज्ञता सप्ताहामध्ये विविध उपक्रम राबवण्यात आले त्याची सांगता ३० जून रोजी होत आहे. यानिमित्त बीड येथे कृतज्ञता सप्ताह निमित्त स्मृतीस्थळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी उपस्थित रहावे असे आवाहनही त्यांनी केले.

मा.श्री.ए.एस. जगताप, दिवाणी न्यायाधीश साहेब (क. स्तर) शिरुर (का) यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रं.१४५/२०२४

अर्जदार - सुमनबाई भ्र. नामदेव मिसाळ वय-६१ वर्षे, धंदा- घरकाम व शेती रा. खोकरमोह ता. शिरुर (का) जि.बीड

विरुध्द निरंक

दावा - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-१८२७ कलम २ नुसार

वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामदेव पि. मालु मिसाळ यांचा मृत्यू झाला. यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत नामदेव पि. मालु मिसाळ यांचा मृत्यू दिनांक २८-०३-२०२४ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत नामदेव पि. मालु मिसाळ यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदाराला शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जरिनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येत की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत नामदेव पि. मालु मिसाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९-०६-२०२४ रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.३१-०७-२०२४ आहे.

मार्फत : ॲड.व्ही.एस. मिसाळ

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,
(क. स्तर) शिरुर (का)

प्रतिलिपी
१) मा. दिवाणी न्यायालय, (क. स्तर) शिरुर (का)
२) तहसिल कार्यालय, शिरुर (का)
३) ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, खोकरमोह

सलग दोन वर्षे राज्यात अव्वल आलेल्या बसस्थानकाला मटका चालकांचा विळखा; महिला प्रवाशांची कुचंबना

अंबाजोगाई । प्रतिनिधी

हिंदु-हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानात अ वर्ग प्रतिवारीत सलग दोन वर्षे राज्यात अव्वल आलेल्या अंबाजोगाई येथील बसस्थानकाला स्थानिक मटका चालकांचा विळखा बसला असून या विळख्यातुन बसस्थानकाची पोलीस प्रशासनाने सुटका करावी अशी मागणी महिला प्रवाशी वर्गाकडून करण्यात येत आहे.

महाराष्ट्रात सर्वाधिक बसेसची ये-जा करणारे बसस्थानक म्हणून अंबाजोगाई येथील बसस्थानकाची नोंद आहे. या बसस्थानकावर दरोरोज किमान साडेतीनशे

बसेसची सतत ये-जा असते. त्यामुळे सतत प्रवासी वर्ग हा खुप मोठ्या प्रमाणावर या बसस्थानकावर असतो. तसेच या बसस्थानकावर बाहेर गावी विविध कार्यालयांत नौकरीस ये-जा करणा-या महिला, अंबाजोगाई येथील शाळा महाविद्यालयांमध्ये ग्रामीण भागातुन शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

या बसस्थानकास बसेसची ये-जा सुरळीत व्हावी यासाठी यापूर्वी दोन प्रवेशद्वार एक आत येणाऱ्या गाड्यांसाठी व एक बाहेर जाणाऱ्या गाड्यांसाठी कार्यरत होते. आता प्रवाशांची व येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांची वाढती संख्या लक्षात घेता प्रवाशांसाठी एक स्वतंत्र व दोन बसेस साठी अशी तीन गेट कार्यान्वीत आहेत.या तीन ही गेटच्या शेजारी व बसस्थानकाच्या सभोवताली अनेक अनाधिकृत टपऱ्या गेली अनेक वर्षांपासून येथे आहेत. या सर्व टप-यांमधुन इतर व्यवसाय कमी व मटका नावाचा जुगार अधिक मोठ्या प्रमाणावर खेळला जातो. त्यामुळे या सर्व टप-या सतत अवैध व्यवसायाशी निगडीत असलेल्या टुकार माणसाने गजबजलेला असतो. या सर्वांचा त्रास या बसस्थानकावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सहन करावा लागतो. याच मुख्य त्रास हा महिला प्रवाशी वर्गाला मोठ्या प्रमाणावर सहन करावा लागत आहे. या सर्व त्रासातुन प्रवासी वर्गाची सुटका करून द्यावी अशी प्रवासी वर्गाची मागणी आहे.

पोलीस प्रशासनाकडून कार्यवाहीची मागणी

अति.जिल्हा पोलीस प्रमुखांनी लक्ष देण्याची मागणी

अंबाजोगाई बस स्थानकावरून मोठ्या प्रमाणावर महिला प्रवासी ये जा करतात. या बसस्थानकाशेजारी असलेल्या मटका चालकांच्या टप-यांचा सर्वाधिक त्रास महिलांना सहन करावा लागतो. शिवाय या टप-यावर उभ्या असणाऱ्या टारगट पोरांच्या अश्लिल कॉमेंट ही महिला व मुलींना एकुण आपला जीव मुठीत घेऊन सहन कराव्या लागतात. या सर्व त्रासातून प्रवासी महिला वर्गांची सुटका करण्यासाठी अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख चेतना तिडके यांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी महिला प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे.

बीड : माणुसकी सेवा फाऊंडेशन जिल्हा बीड.वतीने येळे बापूराव यांना नाळवंडी सर्कल प्रमुख पदी तर मोटारकर गणेश यांना ढेकनमोहा पंचायत समिती प्रमुख ससाने प्रकाश यांना नाळवंडी पंचायत समिती प्रमुख आशा नियुक्त्या जिल्हा अध्यक्ष मस्के सर यांच्या हस्ते करण्यात आल्या या वेळी जिल्हा सचिव ढोकणे विठ्ठल, जिल्हा कार्याध्यक्ष लांडगे साहेब, जिल्हा सह सचिव डोळस सर, तालुका अध्यक्ष नितीन शिंदे, शहराध्यक्ष वाघमारे भास्कर इत्यादी उपस्थित होते.या वेळी या तिघांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

पंचशील नगर, माऊलीकॉलनी, जिजाऊ नगरमध्ये चोऱ्या वाढल्या

पोलिसांनी गस्त वाढवावी-प्रमोद शिंदे

बीड । प्रतिनिधी

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील पंचशील नगर, माऊली कॉलनी, जिजाऊ नगर, संतकबीर नगर परिसरात गेल्या काही दिवसापासून चोरांच्या घटनांमध्ये वाढ होऊ लागली आहे. पंचशील नगर, जिजाऊ नगर,माऊली कॉलनी, संत कबीर नगर या भागामध्ये दररोज चोरटे येत असल्यामुळे नागरिकांना रात्र जागून काढावी लागत आहे.

चोरीच्या वाढत्या घटनामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे पोलिसांनी या भागामध्ये रात्रीची गस्त वाढवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद शिंदे यांनी केली आहे.

दिंद्रुड : माजलगाव तालुक्यातील सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहशिक्षक काशिनाथ आकुसकर वयोमानानुसार शनिवारी सेवानिवृत्ती झाले. यानिमित्त दिंद्रुडच्या वीरशैव समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करत भावी निरोगी,सदृढ,आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यासाठी दत्तात्रय रेणगडे, विजयकुमार शेटे, संतोष स्वामी, नागेश कानडे,भारत गौंडर, सुनील काटकर, ईश्वर गौंडर उपस्थित होते.

शिक्षकांनी कर्तव्यदक्ष राहून ज्ञानार्जनाचे काम करावे तरच पुढची पिढी सुधारेल - बिईओ रविंद्र महामुनी

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील जिल्हा परिषद प्रा. (मुलांची) शाळेचे जेष्ठ शिक्षक महादेव कटारे काल शुक्रवारी (दि.२८) सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन दिंद्रुड केंद्रातील शाळेच्या सर्व शिक्षक बांधवांनी केले होते. याप्रसंगी बोलताना जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांनी गुणवत्ता राखून ठेवत, कर्तव्यदक्ष राहुन ज्ञानार्जनाचे काम करावे आणि आपल्या देशाचे

दिंद्रुड जि. प. शाळेचे जेष्ठ शिक्षक महादेव कटारे यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा संपन्न

उद्याचे भविष्य चांगल्या पद्धतीने घडवले पाहिजे, तरच पुढची पिढी सुधारेल. असे मत गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाला विशेष अतिथी माजलगाव चे गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, अध्यक्ष म्हणून केंद्रीय मुख्याध्यापक वचिष्ठ मुंडे, प्रमुख पाहुणे केंद्रप्रमुख अमृत कुलकर्णी, साधन व्यक्ती रवी आदमाने तर मुख्याध्यापक मंचक सोळंके, जेष्ठ पत्रकार बंडूजी खांडेकर, ◀◀ पान ३ वर

पीकविमा नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांची रक्कम तात्काळ खात्यात वर्ग करा - आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२३ - २४ चा अग्रिम पिकविमा वाटप झाला आहे, मात्र त्यानंतर नैसर्गिक आपत्ती अंतर्गतच्या शेतकऱ्यांनी रीतसर ऑनलाइन तक्रार केल्या आहेत, त्या शेतकऱ्यांचे पंचनामे झाले आहेत अशा शेतकऱ्यांना नुकसानीच्या प्रमाणात पीक विमा कंपनीकडून नुकसान भरपाई रकमेची वितरण झालेले नाही. ए.आय.सी. इंडिया या पिकविमा कंपनीने तात्काळ नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग करावी अशी मागणी माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

संपूर्ण राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पात्र शेतकऱ्यांना पिकविमा रक्कम अदा केली जात आहे. मात्र बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ती अदा केली जात नाही. खरीप हंगामातील पेरण्या उरकत आलेले आहेत. काही ठिकाणी पेरण्या होऊन मशागतीचे देखील कामे उरकले जात आहेत.अशा वेळी गेल्या वर्षीच्या ज्या ज्या शेतकऱ्यांनी नैसर्गिक आपत्तीत पिकाचे नुकसान झालेले म्हणून कंपनीकडे रीतसर ऑनलाईन तक्रार केल्या आहेत अशा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम मिळायला हवी होती. त्या शेतकऱ्यांना या रकमेतून मदत मिळेल मात्र ती रक्कम अद्याप देखील मिळाली नाही. विलंब न करता संबंधित पिकविमा कंपनीने ती तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करावी अशी मागणी माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे केली आहे.

कुंडलिक खांडे प्रकरणी शिरूर शहर कडकडीत बंद; पुतळा जाळून केला निषेध

मानूर । प्रतिनिधी :

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या ऑडियो क्लीप प्रकरणी सकल ओबीसी समाजाच्या वतीने पुकारलेल्या बंदला व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे बंद ठेवून प्रतिसाद दिला.या वेळी सकल ओबीसी समाजाच्या वतीने जिजामाता चौकात एकत्र येऊन कुंडलिक खांडे यांचा पुतळा जाळून निषेध व्यक्त करण्यात आला.या वेळी जमलेल्या ओबीसी समाजाच्या लोकांनी कुंडलिक खांडे यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.ओबीसी समाजाच्या वतीने सकाळी शहरात फेरी मारण्यात आली.दिवसभर व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवून बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.२७ जून रोजी कुंडलिक खांडे नावाच्या व्यक्तीने ओबीसी समाजाचे दैवत तसेच पालकमंत्री धनंजय मुंडे आणि वाल्मीक कराड यांच्या विषयी काही वाईट वक्तव्य केले होते.त्यामुळे सकल ओबीसी समाजाच्या भावना दुखावल्या म्हणून शनिवारी बंदचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी माजी जि.प.सदस्य दशरथ वनवे,युवा नेते नवनाथ ढाकणे,दिलीप खेडकर, ◀◀ पान ३ वर

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीच्या वतीने दिनांक ०१ जुलै २०२४ रोजी भव्य रक्तदान शिबीर व वृक्षरोपंन कार्यक्रम माजलगाव शहरातील देशपांडे हॉस्पिटल समता कॉलनी माजलगाव येथे आयोजित करण्यात आलेले आहे.तरी माजलगाव शहरातील व माजलगाव परिसरातील नागरिकांना सदरील कार्यक्रमात आवर्जून सहभाग नोंदवावा असे आवाहन रोटरी क्लब ऑफ माजलगावचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री मंगलनाथ मल्टिस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक

ॲड.रवींद्र कानडे व सचिव सौ. लता जोशी यांनी केले आहे.

रोटरी क्लब ऑफ माजलगावच्या माध्यमातून वर्षभरामध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन प्रामुख्याने होत असते.सन २०२४-२५ करीता रोटरी क्लब ऑफ माजलगावच्या अध्यक्षपदी श्री रवींद्र कानडे यांची नुकतीच नियुक्ती झाली असून लवकरच पदग्रहण सोहळा संपन्न होणार आहे.त्यांच्या अध्यक्षीय कार्यकाळा मधील हा पहिलाच कार्यक्रम असून येत्या वर्षभरामध्ये माजलगाव शहरातील व परिसरातील नागरिका करिता विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबवण्यात येणार असल्याचे रवीन्द्र कानडे यांनी सांगीतले.

लग्न वाढदिवसानिमित्त गवळी दाम्पत्याने केले वृक्षारोपण

वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील देवगाव येथील रहिवासी असणारे सामाजिक शैक्षणिक कार्यात सतत अग्रेसर असणारे श्री लहु गवळी व सौ गिता गवळी या दोघांनी लग्नाच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला आहे..

मित्रांनो आज मी तुम्हाला एक अतिशय कळकळीची विनंती करीत आहे.झाडे लावा व ती जगवण्याचा अटोकाट प्रयत्न करा''कारण झाड लावली आणि ती जगवली तरच तुम्ही आम्ही जगणार आहोत.यावर्षी उन्हाळ्यात आपल्या भागातील तापमानात किती वाढ झाली होती हे सर्वांना माहित आहे.अजूनही उत्तर भारतात उष्णतेची ◀◀ पान ३ वर

विवाहित महिलेला जुन्या प्रियकराच्या नावाने चिडवने पडले महाग

सहा जणाविरुद्ध विनयभंगासह चाकूहल्ला प्रकरणी गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

विवाहित महिलेच्या घरासमोर जाऊन तिला जुन्या प्रियकाराच्या नावाने चिडवन्यात आले असून तिच्या पतीवरही चाकू हल्ला करण्यात आला.दरम्यान महिलेला लज्जा वाटेल असे कृत्य करणेही युवकांना महागात पडले. याप्रकरणी जिजामाता नगरच्या ६ जणाविरुद्ध माजलगाव शहर पोलिसात चाकु हाल्ला व विनयभंगासह इतर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत पोलीस सुत्रांकडून समजलेली माहिती अशी की,ज्योती अजयकुमार चव्हाण (रा.जिजामाता नगर) या विवाहित महिलेला दि.२७ जुन रोजी दुपारी ४:३० वाजता ६ जण संगणमत करून घरासमोर गेले.व लग्ना अगोदरचा प्रियकर याचे नाव घेवुन विवाहित महिलेस पांड्या आला, पांडया आला' असे चिडवत मोठमोठ्याने आरडा ओरडा करू लागले. तेंव्हा महिलेचा पती अजयकुमार हा घराचे आहेर आला व त्यांना म्हणाला की तुम्ही आमचे घरासमोर थांबु नका,असे म्हणताच त्यास तुझे बापाची जागा आहे का असे म्हणुन शिवीगाळ केली व त्यांचे उजवे हाताचे अंगठयावर चाकुने ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

संत ज्ञानेश्वर, तुकाराम महाराजांच्या पालख्यांचे आज पुण्यात आगमन

मनपाकडून जय्यत तयारी, पालख्यांचा मुक्काम विठोबा मंदिर व निवडुंगा विठोबा मंदिर या ठिकाणी होणार

पुणे । प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे याही वर्षी संत ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे पुणे शहरात रविवार (दि. ३०) रोजी आगमन होणार आहे. यावेळी दोन्ही पालखांच्या स्वागताच्या तयारीत संपूर्ण भवानी व नाना पेठेतील मंदिर परिसर सज्ज झाले आहे. ठिकठिकाणी विद्युत रोषणाई, मांडव, रंगरंगोटी, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, पिण्याच्या पाणीचे टँकर, सीसीटीव्ही कॅमेरे, मोबाईल टॉयलेट, औषध फवारणी, आरोग्य शिबिरे अशा प्रकारच्या आदी सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

यावेळी साखळपीर तालीम, श्रीमती सावित्री बाई फुले प्रशाला, रफी महंमद किडभाई शाळा, महाजनवाडी, तिलवंत तेली समाज, भिकुबाई मेनकुदळे, टिंबर मार्केट, मार्केट यार्ड, बाल जीवन शाळा, नवसेवक तरुण मंडळ अशा विविध ठिकाणी ओपन जागेत शेड टाकून वारकऱ्यांकरिता राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. विशेषत: यामध्ये वारकऱ्यांच्या सेवेकरिता ठिकठिकाणी सोसायट्या व अनेक सार्वजनिक मंडळांनी हिरहिरीने सहभाग घेतला आहे. तसेच मनपाच्या विविध विभागांच्यावतीने पालखी सोहळ्यामध्ये सहभागी वारकऱ्यांकरिता फिरत्या दवाखान्यांद्वारे मोफत आरोग्यसेवा पुरविली जाणार आहे. त्याचबरोबर पशु वैद्यकीय विभागामार्फत पुणे मनपा हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याचे काम सुरू ठेवले आहे. भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत स्वच्छता विषयक कामकाज करण्यासाठी अंदाजे एकूण ३५० पुरुष सफाई सेवक व २५० महिला सफाई सेविका असे एकूण ६०० सफाई सेवक कार्यरत आहेत.

महिला वारकऱ्यांसाठी ५०,००० सॅनिटरी नॅपकिन्सचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. सदरील पालख्यांचा मुक्काम पालखी विठोबा मंदिर व निवडुंगा विठोबा

मंदिर या ठिकाणी होत असल्याने सदरील दोन्ही मंदिरांची अग्निशमन दलाकडून पाहणी करण्यात आली. पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डातील महात्मा गांधी रोडवरील बोर्डाने सर्वाधिक अतिक्रमण हद्दपार केले आहे. पेठांमधील व लष्कर भागातील पोलीस यंत्रणा मोठ्या प्रमाणात सज्ज झाली आहे. आळंदीहून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान होत असून पालखीच्या स्वागतासाठी विश्रांतवाडी, कळस, येरवडा परिसर येथे जय्यत तयारी उत्साहात चालू आहे. येथील म्हस्के वस्तीत पुणे शहरात पालखी दाखल होते. पुणे महानगपालिकेतर्फे येथे जंगी स्वागत केले जाते. त्यासाठी करआकारणी केंद्राजवळ स्वागत कक्ष, वैद्यकीय कक्ष, हिरकणी कक्ष व वारकर्यांसाठी विसावा कक्ष उभारण्यात आला आहे. दत्तमंदिर, पोलीस लाईन, शांतीनगर व डेक्कन कॉलेज येथे विसावा कक्ष उभारण्यात आला आहे. पाच ठिकाणी वैद्यकीय कक्ष उभारण्यात आले आहेत. सगळीकडची स्वच्छता करण्यात आली आहे. ९० टक्के तयारी झाली असून अजून तयारी चालू असल्याचे येरवडा क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त चंद्रसेन नागटिळक यांनी सांगितले. परिसरात विविध सामाजिक व सार्वजनिक संस्था, संघटना, मंडळे व राजकीय नेत्यांतर्फे पालखीचे स्वागत केले जाते. यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारले जात आहेत. विविध संस्था-संघटनांतर्फे वारकर्यांना अन्नवाटप, फळवाटप, पाणीवाटप केले जाते. त्याचबरोबर विविध संस्थांतर्फे वारकर्यांचे आरोग्य तपासणी शिबिर घेतले जाते. दरवर्षी अष्टविनायक मंडळातर्फे वारकर्यांच्या पायांना मसाज सेवा दिली जाते. तसेच चर्मकार संघटनेतर्फे चप्पल दुरुस्ती सेवा मोफत दिली जाते.

दिघी-आळंदी मार्गावर कारची दुचाकीला जोराची धडक; तरुणाचा जागीच मृत्यू

विश्रांतवाडी । प्रतिनिधी

दिघी-आळंदी रस्त्यावर आर्मी पब्लिक स्कूलजवळ एका भरधाव बलेनो कारने दुचाकीस जोरदार धडक दिल्याने स्वप्निल प्रदीप खरबडे (गजानन महाराजनगर, दिघी) हा तरुण जागीच ठार झाला. तर, प्रतीक सुरेश चांदोरे (गजानन महाराज मंदिर, दिघी) हा जखमी झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्याचा मित्र विश्रांतवाडीवरून आळंदी रोडने जात असताना समोरून निळ्या रंगाची बलेनो कार आली आणि त्याने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत स्वप्निलचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर बलेनो कारचा चालक सतीश वाळके हा पळून गेला. याबाबत विश्रांतवाडी पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला असून खडकी विभागाच्या सहायक पोलिस आयुक्त आरती बनसोडे, विश्रांतवाडी पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक कांचन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक अंसार शेख, पोलिस उपनिरीक्षक नितीन राठोड तपास करीत आहेत. अपघातील फरार आरोपी सतीश वाळके याला पकडण्यासाठी पोलिसांची चार पथके रवाना झाली आहेत.

पुण्यात पुन्हा अल्पवयीन मुलाकडून अपघात; १४ वर्षांच्या मुलानं टँकरनं अनेकांना उडवलं

पुणे । प्रतिनिधी

पोर्शे अपघातानंतर आणखी एका अल्पवयीन मुलाकडून पुण्यातील वानवडीत आणखी एक भीषण अपघात. धक्कादायक बाब म्हणजे, टँकरच्या धडकेत इतरही काहीजण जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. एक १४ वर्षांचा मुलगा टँकर चालवत होता. त्यानं टँकरनं अनेकांना धडक दिली. सकाळी व्यायामासाठी बाहेर पडलेल्या मुलांना, तसेच एका दुचाकीवरुन जाणाऱ्या महिलेलाही या मुलानं धडक दिली आहे. दरम्यान, सकाळी साडेसहाच्या सुमारास हा अपघात झाला.

टँकर अवघ्या १४ वर्षांच्या मुलाच्या ताब्यात देण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आल्यानं पुण्यात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. पुण्यातल्या वानवडी येथे भरधाव टँकरनं सकाळी व्यायामासाठी बाहेर पडलेल्या मुलांना धडक दिली. तसेच, एका दुचाकी चालक महिलेला देखील धडक दिली. हा अपघात सकाळी साडे सहाच्या सुमारास घडला. या अपघातात काही मुले आणि महिला जखमी झाली आहे. विशेष म्हणजे या अपघाताला कारणीभूत ठरलेला टँकर अवघ्या १४ वर्षांचा मुलगा चालवीत होता. नागरिकांनी हा टँकर अडवून धरला असून चालकाला पकडून ठेवलं आहे.

वानवडी येथे भरधाव टँकरनं सकाळी व्यायामासाठी बाहेर पडलेल्या मुलांना धडक दिली. तसेच, एका दुचाकी चालक महिलेला देखील धडक दिली. हा अपघात सकाळी साडे सहाच्या सुमारास घडला. या अपघातात काही मुलं आणि महिला जखमी झाली आहे. विशेष म्हणजे, या अपघाताला कारणीभूत ठरलेला टँकर अवघ्या १४ वर्षांचा मुलगा चालवीत होता. नागरिकांनी हा टँकर अडवून धरला असून अल्पवयीन चालकाला पकडून ठेवलं आहे. पुण्यात कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर देखील अनेक गंभीर अपघात घडत आहेत. एका हायवा ट्रकनं मार्केटयार्ड येथे एका महिलेला चिरडलं होतं. तसेच, कात्रज येथे एसटी बसच्या धडकेत अभियंता तरुणीचा प्राण गेला होता. उंड्री येथे ट्रक दुचाकीच्या झालेल्या अपघातात एका तरुणीला जीव गमवावा लागला होता. एका पाठोपाठ एक असे अनेक अपघात घडत असताना देखील अनेक अल्पवयीन मुलं वाहने चालवताना शहरात दिसत आहेत. त्यातच अवजड टँकर अवघ्या १४ वर्षांच्या मुलाच्या ताब्यात देण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आल्यानं खळबळ उडाली आहे. नागरिकांनी या अल्पवयीन मुलाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे. दुचाकीवरून कुस्ती प्रशिक्षक संतोष ढुमे आणि त्यांची पत्नी जात होती. त्यांच्या तालमीत शिकणाऱ्या मुली व्यायामासाठी रस्त्यावरून धावत होत्या. टँकरची दुचाकीला धडक बसताच त्यांची पत्नी दुचाकीवरून डबून थेट समोर रस्त्यावर पडली. तर, टँकरखाली दोन मुली आल्या. स्वतः ढुमे यांनी या मुलींना बाहेर काढलं. या अपघातात मुलीही जखमी झाल्या आहेत.

झिका व्हायरस : मुंढव्यात सापडला तिसरा रुग्ण

पुणे : पुण्यात झिका व्हायरसचा आणखी एक रुग्ण आढळून आलाय. पुण्यातील मुंढवा भागातील एका ४७ वर्षीय महिलेचा रक्त चाचणीचा अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. या आधी पुण्यातील एरंडवणे भागातील एक डॉक्टर आणि त्यांची मुलगी झिका पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. त्यामुळे पुण्यात झीकाचा धोका वाढताना दिसतोय. डासांपासून हा आजार पसरतोय. ऐन वारीच्या तोंडावर झिकाचे तीन रुग्ण आढळल्याने मोठी खळबळ उडाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आफ्रिका, अमेरिका आणि दक्षिण भारतात आढळतो. मात्र लागण झालेल्या रुग्णांनी कुठेही प्रवास केलेला नाही, त्यामुळे झिका पुण्यात आला कुठून हा मोठा प्रश्न अनुत्तरीत आहे.

पुण्यात झिका व्हायरसचे दोन रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणा खडबडून जागी झालीय. पावसाळा असल्याने अनेक आजार डोकं वर काढत असतानाच पुण्यात याचे दोन रुग्ण आढळले आहेत. झिका व्हायरसचा सर्वाधिक धोका गरोदर महिलांना असल्याचं

आरोग्य अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आलं आहे. झिकाचा प्रसार हा एडिस एजिप्ती डासापासून होतो. पुण्यात आतापर्यंत जेव्हा जेव्हा रुग्ण सापडले तेव्हा त्यांनी कुठे ना कुठे प्रवास केला होता किंवा ते कोणाच्या तरी संपर्कात आले होते. मात्र आता सापडलेले रुग्णाच्या संसर्गाची साखळी अद्याप सापडलेली नाही. संसर्गाचे मूळच शोधले नाही तर संसर्गाचा धोका अधिक असल्याची भीती वर्तवण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कर्मचार्यांना झिका रुग्ण आढळलेल्या भागात योग्य त्या उपाययोजना राबविण्याचे आदेश जारी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. झिका व्हायरस हा डासाने चावा घेतल्याने तर होतो. मात्र या व्हायरसचा लैंगिक संबधातून देखील प्रसार होतो.. त्यामुळे जर लक्षण आढळली तर शारीरिक संबंध ठेवू नका आणि गरोदर महिला असेल तर शेवटच्या तीन महिन्यात जास्त काळजी घेण्याची गरज आहे. यामुळे बाळाच्या मेंदूवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

अजितदादा गटाचे २२ आमदार संपर्कात, रोहित पवारांचा खळबळजनक दावा!

बारामती । प्रतिनिधी

अजित पवार गटाच्या १८-१९ आमदारांनी आमच्याशी संपर्क साधला असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. मात्र शरद पवार त्यातल्या १० ते १२ आमदारांनाच घेतील असंही रोहित पवार म्हणाले आहेत. भाजप अजित पवार गटाला फक्त २० जागा देईल किंवा स्वतंत्र लढण्यासही सांगेल असंही रोहित पवार म्हणाले आहेत. दरम्यान, रोहित पवारांच्या दाव्यानंतर आता महाराष्ट्राला विधानसभेपूर्वी पुन्हा एकदा राजकीय भूकंप पाहायला मिळणार की, काय? अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी जयंत पाटील विधीमंडळात होते, त्यावेळी अजित पवार गटाचे काही आमदार तिथे जाऊन त्यांना भेटल्याच्या चर्चा होत्या. त्यासंदर्भात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार म्हणाले की, जयंत पाटील खूप अनुभवी नेते आहेत. त्यामुळे कसं, कधी, कोणतं कार्ड बाहेर काढायचं? हे त्यांना खूप चांगलं माहीत आहे. त्यामुळे ही फक्त सुरुवात आहे. पुढे बघा काय होतंय. शरद पवार तर, राजकारणात, महाविकास आघाडीच्या नेत्यांपेक्षाही फार पुढे आहेत हे लोकसभा निवडणुकांमध्ये साहेबांनी दाखवून दिलंच आहे. विधानसभेत तर ते आणखी जास्त दाखवतील. त्यामुळे शरद पवार आणि त्यांना जोडीला जयंत पाटील, इतर आमच्यासारखे कार्यकर्त्यांचंही स्वागत आहे. पण ज्या लोकांनी अतिपणा केला. कुठेतरी लोकांच्या विरोधात जाऊन निर्णय घेतले. अशा लोकांबाबत साहेब आणि जयंत पाटील योग्य निर्णय घेतील, असं वाटतंय.

अजित पवारांना विरोध होताना पाहायला मिळतंय, पुण्यानंतर इंदापूरमध्ये एका कार्यकर्त्यानं थेट अजित पवारांचं नाव घेऊन विरोध दर्शवला. त्याबाबत बोलताना रोहित पवार म्हणाले की, सुरुवातीपासून आम्ही हेच सांगतोय की भाजप नेहमीच लोकनेत्याला संपवतं आणि अजित पवारांच्या बाबतीत तेच होणार आहे. आता नेतेदेखील अजित पवारांबाबत खूप बोलतात. पण ते फारसं सकारात्मक नसतं. अशातच आता कार्यकर्त्यांनाही धाडसं आलं आहे अजित पवारांबाबत बोलायला. मग आता हे ठरलंय की, मुद्दाम केलं जातंय. अजित दादांना वेगळं करायचं. सर्व जागांवर अजित दादांना उभं करायचं. पाडण्यासाठी उभं करायचं. शरद पवारांचा पक्ष आहे, त्यांची मतं खाण्यासाठी उभं करायचं. पण आमदार एवढे खुळे नाहीत ना? त्यांनाही माहीत आहे, भाजप त्यांचा कसा वापर करणार आहे. त्यामुळे एकतर अजित पवार भाजपसोबत राहिले तर त्यांना २० ते २२ जागा दिल्या जातील. आणि जर ते भाजपसोबत नाही राहिले तर मात्र सगळ्या जागांवर त्यांचे आमदार उभे राहतील, पण निवडून मात्र कोणीच येणार नाही.

अजित पवारांकडून शरद पवारांकडे किती आमदार येतील? यावर बोलताना रोहित पवार म्हणाले की, चर्चेत तर अनेक आहेत, पण शरद पवार गटात येणाऱ्या आमदारांचा आकडा हा १८, १९, २० च्या पुढे आहे. घ्यायचं कोणाला हे शरद पवार आणि जयंत पाटील ठरवतील. काही आमदार खूप आधीपासूनच संपर्कात आहेत. त्यांना अनेक वेगळ्या गोष्टींमध्ये अडकवलं जाईल. त्यांच्या नातेवाईकांना अडकवलं जाईल, त्यामुळे काही आमदार तिकडे गेले आहेत. ते आमदार विचाराचे पक्के आहेत, पण भितीपोटी ते तिकडे गेले आहेत, अशा आमदारांचा विचार केला जाईल, असा शरद पवारांच्या स्वभावावरुन मला वाटतोय.

बिबट्याच्या दर्शनाने मोहितेवाडीत घबराट

चाकण । प्रतिनिधी

मोहितेवाडी व चिंचोशी (ता. खेड) परिसरातील उसाच्या शेतात बिबट्या दिसल्याने शेतकरी तसेच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बिबट्या दिसल्यानंतर त्याचा व्हिडिओही काही शेतकऱ्यांनी काढला. याबाबतची माहिती चाकण वनविभागाला देण्यात आली.

मोहितेवाडी, चिंचोशी परिसरातील उसाच्या शेतात बिबट्याचे अनेक दिवसांपासून वास्तव्य आहे. चिंचोशी परिसरातही एका उसाच्या शेतात बिबट्याची बछडीही सापडली होती. त्यानंतर उसाच्या शेतात बिबट्या दिसल्याने व उसाचे शेत वस्तीजवळ असल्याने शेतकरी, महिला, नागरिक यांच्यामध्ये भीतीचे वातावरण आहे. सध्या मशागती, खुरपणी, पाणी देणे, काही पिकांची काढणी आदी कामांसाठी शेतकरी महिलांना शेतात जावे लागत आहे. याबाबत चाकण वनपरिक्षेत्राचे अधिकारी संतोष कंक यांनी सांगितले की, मोहितेवाडी परिसरात बिबट्या दिसलेला आहे. परिसरात पिंजरा लावण्यात येणार आहे. शेतकऱ्यात भीतीचे वातावरण पसरू नये यासाठी जनजागृती वन विभागाच्या वतीने करण्यात येणार आहे.दरम्यान, मोहितेवाडी परिसरातील बिबट्या लवकरात लवकर पकडण्यात यावा, अशी मागणी शेलपिंपळगाव चे सरपंच शरद मोहिते यांनी केली आहे

जुन्नरला छत्रपती शिवराय वनउद्यानाचे आज लोकार्पण

जुन्नर । प्रतिनिधी

जुन्नर वनविभागाने किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी साकारलेल्या छत्रपती शिवराय वनउद्यानाचे रविवारी (ता. ३०) लोकार्पण करण्यात येणार असल्याचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते व वनपरीक्षेत्र अधिकारी प्रदिप चव्हाण यांनी सांगितले.

शिवराय संकुल येथे खासदार डॉ. अमोल कोल्हे व आमदार अतुल बेनके व मान्यवरांच्या उपस्थितीत लोकार्पण सोहळा होणार आहे. संघटित पर्यटनाद्वारे तालुक्यातील पर्यटनास चालना मिळावी, येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिकांना जैवविविधतेचे महत्त्व अवगत व्हावे, या उद्देशाने उपवनसंरक्षक सातपुते यांच्या संकल्पनेतून व सहाय्यक वनसंरक्षक अमित भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली हे उद्यान साकारले आहे. उद्यानातील कामे निसर्गानुरूप केली असल्याने पर्यटकांना इतिहासाची, संस्कृतीची आणि परंपरेची ओळख होण्यास मदत होणार आहे.

गोळीबारात मृत्यू; गौतम काकडेंच्या अटकेची मागणी

बारामती । प्रतिनिधी

निंबुत (ता. बारामती) येथील गोळीबार प्रकरणातील जखमी रणजित निंबाळकर यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे बैलगाडा क्षेत्रातील चाहते आणि नातेवाईक संतप्त झाले. सुमारे सातशे ते आठशे लोकांनी वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्याकडे धाव घेतली. पोलिस ठाण्यापुढे ठिय्या मारत फरार आरोपी गौतम काकडे यांना त्वरित अटक करून कठोर शासन करण्याची मागणी केली.

पोलिसांनी शंभर टक्के कठोर कारवाई करण्याचे जमावाला आश्वासन दिले असून शांतता राखण्याचे अवाहन केले आहे. बैलगाडा शर्यत क्षेत्रातील गौतम काकडे यांनी फलटण येथील रणजीत निंबाळकर यांचा 'सुंदर' नावाचा बैल सोमवारी पाच लाख रुपये इसार देऊन खरेदी केला होता. मंगळवारी रात्री उर्वरित रक्कम नेण्यासाठी बोलावले होते. निंबाळकर हे पत्नी, मुलगी, दोन मित्रांसह पैसे गौतम काकडे यांच्या घरी गेले. घरासमोर चर्चेतून वादावादी झाली. याप्रसंगी गौतम काकडे यांचे बंधू

गौरव यांनी पिस्तूलातून थेट रणजित यांच्या डोक्यात गोळी झाडली. पहाटे रणजीत यांचा मृत्यू झाला. ही बातमी दिवसभर बारामती आणि फलटण तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली. बैलगाडा क्षेत्रातील मोठे नाव असलेल्या निंबाळकर यांचे चाहते संतप्त झाले आहेत. शेकडो लोकांनी फलटण पोलीस ठाण्यासमोर धाव घेतली. गौतम काकडे यांना अटक झालीच पाहिजे अशा घोषणा दिल्या. दरम्यान, वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यावरही निंबाळकर यांचे नातेवाईक व बैलगाडा शर्यत प्रेमींनी दुपारी मोठी गर्दी केली. दोननंतर जमाव सात-आठशेपर्यंत पोहोचला. पोलीस ठाण्यासमोरच बैठक मारत जमावाने आपल्या भावना व्यक्त केल्या. रणजित यांची पत्नी अंकिता, वडील एकनाथ हेही जमवासोबत होते. याप्रसंगी एक नातेवाईक महिलेने, पोलिसांना जमत नसेल तर आम्ही न्याय करू असा इशारा दिला. तर काही तरुणांनी, गौतम काकडे यांना आजच्या आज अटक करून कठोरातील कठोर शासन करा. सुन्दर बैल ताब्यात द्या. अशी मागणी केली.बैलगाडा प्रेमींनीही या घटनेचा निषेध केला आहे. सुंदर नावाचा बैल परत द्यावा अशीही मागणी करण्यात आली. वडील एकनाथ निंबाळकर, मित्र सचिन श्रीरंग देशमुख, भावजय कोमल निंबाळकर, चुलती संगीता निंबाळकर, मित्र सलीम शेख यांनीही शोकाकुल अवस्थेत संतप्त भावना व्यक्त केल्या. पत्नी अंकिता यांनी, आम्ही परत फिरत असताना त्यांनी नऊ महिन्याच्या मुलीसमोर पतीवर गोळी घातली, असे रडत रडत सांगितले. तसेच सोशल मीडियावर देखील या घटनेवर संतापजनक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. दरम्यान, सहायक पोलिस निरीक्षक तथा तपास अधिकारी राहुल घुगे यांनी समोरे जात जमावाची यशस्वीपणे समजूत घातली. तसेच गुन्हेगारांवर शंभर टक्के कठोर कारवाई होईल. आम्हाला तपास करू द्या. महत्त्वाचा वेळ जाऊ देऊ नका, अशी विनंती केली. तसेच शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

मूल्य साखळीचे 'स्मार्ट'च्या अधिकाऱ्यांना बारामतीत धडे

बारामती । प्रतिनिधी

बारामती येथील ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी विज्ञान केंद्रात व्हॅन हॉल लॉरेनस्टाईन विद्यापीठ, नेदरलँड यांच्या तज्ज्ञांमार्फत आयोजित प्रशिक्षणात 'स्मार्टच्या' अधिकाऱ्यांनी मूल्य साखळी विकासाचे धडे गिरविले. 'फळे व भाजीपाला मूल्य साखळी विकास' याच्याशी निगडित विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, व्हॅन हॉल लॉरेनस्टाईन विद्यापीठ आणि बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट, पुणे विभाग कार्यालय) संस्थांच्या संयुक्त विद्यामाने 'मूल्य साखळी' विकास क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम गुरुवारी (ता.२७) राबविविण्यात आला. त्यामध्ये महाराष्ट्रातील स्मार्टच्या अनेक अधिकाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले.

ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) हा जागतिक बँक अर्थसहाय्यित प्रकल्प मुख्यतः कृषी विभाग आणि अन्य संलग्न विभागांमार्फत राज्यात राबविण्यात येतो. या प्रकल्प व कराराअंतर्गत समुदाय आधारित संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्यांना केंद्रस्थानी ठेवून 'फळे व भाजीपाला मूल्य साखळी विकास' याच्याशी निगडित विविध विषयांवर प्रशिक्षण घेण्यात येतात. त्याचाच एक भाग विचारात घेत बारामती कृषी विद्यान केंद्र, माळेगाव खुर्द येथे 'मूल्य साखळी' विकास क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम राबविविण्यात आला.

व्हॅन हॉल लॉरेनस्टाईन विद्यापीठ-नेदरलँडस् येथील श्रीमती एंजेली बेनेन व डॅनियल मॅगवेगवे यांनी प्रशिक्षणार्थींना कौशल्य आधारित प्रशिक्षण दिले. महाराष्ट्रात शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेतीमाल काढल्यानंतर ते विक्रीपर्यंतच्या विविध टप्प्यांवर येणाऱ्या अडचणींवर परदेशातील उपलब्ध तंत्रज्ञानाच्या आधारे कशाप्रकारे मात करता येईल, याची माहिती प्रशिक्षणार्थिंला दिली. यावेळी येथील भाजीपाला गुणवत्ता केंद्र- कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांचेही मार्गदर्शक संबंधितांना महत्वपूर्ण ठरले.

या प्रशिक्षणाच्या यशस्वी नियोजनाकरिता स्मार्टचे प्रकल्प संचालक डॉ. हेमंत वसेकर, ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश नलावडे, अटल इनक्युबेशन सेंटरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी जया तिवारी, समन्वयक यशवंत जगदाळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच यावेळी ग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या.